म. ग्रं. सं. ठाणें

विषय निबंध

संग्रहालय क्रमांक ३५ ५६८

लेखक नारायण विष्णु बापट

पुस्तकाचें नांव संस्कृत विद्येचे पुनरुज्जीवन

सन

३५

संस्कृ.

# संस्कृत विद्येचे पुनरुज्जीवन.

निबंध

म. ग्रं. सं. ठाणे
षय
नं.

# 'यूनियन् क्लब्'

## नामक मंडळीच्या आश्रयाखालीं आरंभिलेली

हेमंतव्याख्यानमाला, वर्ष तिसरें.

व्याख्यान चवथें.

विषय,

## संस्कृतविद्येचें पुनरुज्जीवन.

व्याख्यानकार,

नारायण विष्णु बापट.

मुंबईंत

"निर्णयसागर" छापखान्याचे मालक यांनीं छापिलें.

१८८८.

किंमत २ आणे.

# संस्कृतविद्येचें पुनरुज्जीवन.

## संवत–काल.

कांहीं दिवसांपूर्वी मीं एका मित्राकडून प्रोफेसर म्याक्सम्युइल्लर ह्यांचा India, what it can teach us ? ह्या नांवाचा ग्रंथ उसना घेऊन समग्र वाचला. त्यांत हिंदुलोकांविषयीं स्तुतिपर अशा अनेक गोष्टी लिहिलेल्या आहेत. त्यांचा उल्लेख करून आपला आपण स्तोत्रपाठ करून रिकामी फुशारकी व अहंता उत्पन्न करण्यांत अर्थ नाहीं. तें काम आलोकडे प्रतिक्रियामनस्क म्हणून आपल्यांपैकीं ज्या लोकांस म्हणण्याचा पाठ पडत चालला आहे त्यांकडून बहुत होत आहे. जे गुण, स्वभावधर्म, आम्हांत आहेत, ज्या आमच्या पूर्वजांच्या पराक्रमांचे, व महत्कृतींचे आम्ही वारशानें संपादक झालों आहों, त्या महत्कृति, ते गुण, स्वभावधर्म, आणि पराक्रम, कधींहो लोपणार नाहींत. त्यांविषयीं वारंवार स्तुतिवाद ऐकून आधुनिककालिक आपली स्थिति बरी होण्याच्या कामीं फारसें हित होण्याचा संभव कमीच म्हटला पाहिजे. म्याक्सम्युइल्लर ह्यांचा ग्रंथ व्याख्यानरूप असून, ज्या लोकांपुढें त्यांनीं तीं व्याख्यानें केलीं त्यांना तीं योग्य होतीं. त्यांचे गैरसमज झालेले असतात ते दूर करून, आमचें खरें स्वरूप त्यांना कळावें अशाविषयीं म्याक्सम्युइल्लर ह्यांनीं त्या व्याख्यानांत यत्न केलेला आहे.

त्या ग्रंथाला परिशिष्टांसारख्या अनेक मोठमोठ्या स्वतंत्र टिपा जोडलेल्या आहेत. त्यांतील मला एक टीप फार महत्त्वाची आणि विचार करण्यास योग्य अशी वाटली. त्या टीपेचा शिरोलेख Renaissance of Sanskrit Literature हा आहे. ज्यांनीं तो ग्रंथ वाचला असेल त्यांना त्या टिपेंतील प्रमेय कळलेलेंच असेल, जे कोणी वाचतील त्यांना तें कळणार आहे. परंतु तो ग्रंथ वाचून समजण्यापुरतें इंग्लिश भाषेचें ज्ञान नसणारे असे लोक बहुत आहेत. आपले सम्माननीय शास्त्री व पंडित ह्यांना त्या टिपेंतील विषय अवश्य कळला पाहिजे, आणि त्यांना तर बहुशः इंग्रेजी येत नसतें हें विदित आहेच. तेव्हां फारसें इंग्रेजी येत नसणाऱ्या, व मुळींच इंग्रेजी कधीं शिकलेले नाहींत अशा, लोकांनाही त्या टिपेंतील विषय कळावा ह्या हेतूनें, तो मराठींत उतरून एकाद्या वर्तमानपत्रांत किंवा मासिक क्रमिक पुस्तकांत छापून प्रसिद्ध करावा असें माझ्या मनांत आलें. इतक्यांत हेमन्तोत्सव समीप आला, तेव्हां त्या टिपेचें मराठी भाषांतर करून येथेंच वाचावें असा मीं निश्चय केला. परंतु भाषांतर करून छापण्याला ग्रंथकाराची परवानगी पाहिजे, ही गोष्ट अंमळ उशिरां लक्ष्यांत आली. परवानगी तर मागितली, परंतु मागण्याला उशीर झाल्यामुळें अद्यापि आली नाहीं. म्हणून भाषांतर करण्याचा बेत रहित करणें प्राप्त झालें. ह्यास्तव आज, त्या टिपेचें शब्दशः भाषांतर न करितां तींतील सिद्धांताचा सारांश मात्र सांगतों. सारांश सांगितल्यानें पूर्ण भाषांतराइतका लाभ न होवो, तथापि अगदींच कमी लाभ होईल

असें नाहीं. म्याक्सम्युइल्लर ह्यांचे मुख्य सिद्धांत कळले म्हणजे पुरे. अस्तु, ह्या लहानशा हकीकतीवरून सर्व श्रोत्यांच्या लक्ष्यांत येईलच कीं, ह्या निबंधांत स्वकपोलकल्पित असें कांहींच नाहीं, परंतु एका महान् युरोपीयन पंडिताच्या इ० स० १८८३ त छापलेल्या ग्रंथांतील मतांचा सारांश आहे.

कोणी म्हणतील दुसऱ्याचें मत नुसतें सांगून फल काय? त्यांत खरें किती, खोटें किती, ह्याविषयीं निबंध लिहिणारानें आपला अभिप्रायही सांगितला पाहिजे. परंतु त्या विषयाचा मी फारसा अभ्यास केलेला नसल्यामुळें त्या मतांतील खऱ्याखोट्याची बिनाखी करण्याचें मला तादृश सामर्थ्य नाहीं. उगाच उचलली जीभ आणि लावली टाळ्याला असें करून उपयोग नाहीं. खंडणाला प्रमाण, आधार, कांहींतरी पाहिजे तो, मीं पुष्कळ शोधला तरी कांहीं मिळत नाहीं. शिवाय, म्याक्सम्युइल्लर ह्यांचा पूर्वोक्त ग्रंथ छापून चारपांच वर्षे झालीं, परंतु त्यांतील मतांचें खंडण केलेलें माझ्या पाहण्यांत आलें नाहीं. प्राचीन-विषय-कोविद अशा एकदोघां मित्रांस प्रसंग पाहून म्याक्सम्युइल्लर ह्यांच्या त्या पूर्वोक्त टिपेंत लिहिलेल्या सिद्धांतांविषयीं आपलें काय मत आहे असें विचारलें. परंतु त्यांनीं सांगितलें कीं, त्या सिद्धांतांचें खंडण करण्याला कांहीं प्रमाण किंवा आधार सांपडत नाहीं. तेव्हां आज ते सिद्धांत संक्षेपतः एथें सांगण्याचा मुख्य हेतु हा कीं, ह्या विद्वन्मंडित सभेंत त्यांविषयीं वाटाघाट होऊन कोणाला त्यांच्याविरुद्ध कांहीं प्रमाण किंवा आधार माहीत असेल तर तो त्यांनीं सांगावा, आणि ‘ वादे वादे जायते तत्त्वबोधः ’ ह्या सूक्तीप्रमाणें सत्याचा निवाडा व्हावा. इतकें मात्र कृपा करून सर्वांनीं लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं, वायफळ कल्पना किंवा अनुमानें सांगून उपयोग नाहीं. म्याक्सम्युइल्लर ह्यांच्या इच्छेप्रमाणें लेखी मुद्देसूद प्रमाण पाहिजे.

आतां गैरसमज न व्हावा ह्याकरितां आजच्या विषयाला नांव योजिलें आहे त्याचा इष्ट अर्थ स्पष्ट करून सांगितला पाहिजे. ‘ संस्कृतविद्येचें पुनरुज्जीवन ’ हें नांव कदाचित् भ्रामक होऊन, आलीकडे ह्या देशांत युनिव्हर्सिट्या स्थापन होऊन त्यांनीं पदव्यांकरितां योजलेल्या परीक्षांच्या विषयांत संस्कृतभाषा दाखल केली, त्यामुळें संस्कृतविद्येला पूर्वीं मालिन्य आलें होतें तें कांहींसें जाऊन तिचा अभ्यास पुनः थोडा थोडा होऊं लागला आहे, तें पुनरुज्जीवन असें कोणी समजतील, तर तें नव्हे. पूर्वीं वैदिककालापासून कित्येक शतकेंपर्यंत संस्कृतविद्येची अव्याहत अभिवृद्धि होत येऊन ख्रिस्तीसनाच्या आरंभापूर्वींच्या पहिल्या शतकापासून सुमारें तीनचार शतकेंपर्यंत त्या अभिवृद्धीला खंड पडला होता, त्या काळांत नवीन ग्रंथ वगैरे अगदीं झाले नाहींत; तदनंतर पुनः पूर्ववत् नवीन ग्रंथ होऊं लागून संस्कृतविद्येची संवृद्धि झाली, त्या गोष्टीला म्याक्सम्युइल्लर पुनरुज्जीवन असें म्हणतात. युरोपखंडांतील इटलिदेशांत जसें पंधराव्या शतकांत विद्या व कला ह्यांचें इतिहाससुप्रसिद्ध, पुनरुज्जीवन झालें, तसाच प्रकार चवथ्या पांचव्या शतकांत ह्या देशांत झाला, असें त्या पंडितांचें मत आहे. इ-

तकी पूर्वसूचना करून आजच्या विषयास आरंभ करतों. प्रोफेसर म्याक्सम्युइलर ह्यांच्या लेखाचें तात्पर्य येणेंप्रमाणें:—

---

आमचा दृढ ग्रह झालेला आहे कीं, खिस्तीसनाच्या आरंभापूर्वीच्या पहिल्या शतकापासून, निदान इ० स० नाच्या तिसऱ्या शतकापर्यंत, भरतवर्षात संस्कृतविद्या अगदीं लुप्तप्राय होती. त्या भाषेंत नवीन ग्रंथ त्या कालावधींत बिलकूल झाले नाहींत. ह्या आमच्या मतावर मुख्य आक्षेप म्हटला म्हणजे संवत नामक जो प्रख्यात काल आहे तो होय. त्याविषयीं लोकांची समजूत व कल्पना आहे, ती येणेंप्रमाणें:—त्या कालाचा आरंभ खि० पू० ५६ व्या वर्षी ( वास्तविक पाहतां ५७ व्या वर्षी, ) कोणाएका विक्रमादित्य नामक राजाच्या प्रतापी कारकीर्दीच्या सुरवातीपासून होतो; त्यानें शक व इतर म्लेच्छलोकांचा संहार केला; त्याची कारकीर्द भरतवर्षातील Augustan age सरस्वती युगच होतें; आणि त्याच्या दरबारीं, १ धन्वंतरि, २ क्षपणक, ३ अमरसिंह, ४ शंकु, ५ वेतालभट्ट, ५ घटकर्पर, ७ कालिदास, ८ वराहमिहिर, ९ वररुचि, हीं नवरत्नें होतीं.

परंतु हिंदुस्तानांतील नाणीं आणि कोरींवलेख ह्यांविषयीं शोध करण्याचा ज्यांना छंद आहे, त्या विद्वान लोकांत हें गुह्य म्हणून फार दिवसांपासून प्रसिद्ध आहे कीं, खि. पू. च्या पहिल्या शतकांत असला कोणी विक्रमादित्य राजा होऊन गेला होता अशाविषयीं लेखी प्रमाण म्हणून कसलें तें बिलकूल नाहीं. असें आहे तथापि असला विचित्र पराक्रम करणारा राजा खि० पू० च्या पहिल्या शतकांत झाला होता, अशी जी लोकश्रद्धा आहे ती मूळ उत्पन्न तरी कशी झाली असावी हें सर्वकाळ मोठें गूढ झालेलें आहे. तें गूढ मिस्टर फर्गस्सन नामक पुरुषानें आपल्या शिल्पकलेच्या ज्ञानानें सोडविलें आहे. ह्या संवतकालाच्या संबंधानें ज्या अडचणी उभ्या राहतात त्या सर्वांचा मिस्टर फर्गस्सन ह्यांनीं परिहार केला असें आमचें म्हणणें नाहीं, परंतु, त्यांनीं तें गूढ सोडविण्याची काढलेली तोड हजार वांख्यांनीं खरी ठरेल असें आम्हांस वाटतें. ती तोड ही. कोरूर नांवाच्या ठिकाणीं म्लेच्छ लोकांशीं, विक्रमादित्य म्हणजे उज्जयिनीचा हर्षराजा ह्याचें इ. स. ५४४ त मोठें युद्ध होऊन त्यांत त्या राजानें म्लेच्छांचा शेवटीं पराभव केला. नंतर म्लेच्छांनीं डोकें पुनः वर केलें नाहीं. त्या लढाईची तारीख घेऊन तीपासून मागें ६×१०० (अथवा १०×६० )=६०० वर्षें त्या नवीन कालाचा आरंभ लोटून, तो विक्रमादित्याचा संवतनांवाचा काल सिद्ध केला असला पाहिजे. ही गोष्ट शाबीत करण्याविषयीं मिस्टर फर्गस्सन ह्यांचा प्रयत्न आहे. आरंभ ६०० वर्षें त्या कोरूरच्या लढाईच्या तारखेच्या मागें लोटला म्हणजे तो खि. पू. ५६ व्या सालांत येऊन पडतो. अलबिरुनी नांवाचा एक गृहस्थ घिझनीचा महमूद ह्यानें सोरटी सोमनाथावर स्वारी केली त्या स्वारींत त्याच्या बरोबर होता. त्यानें एक ग्रंथ लिहिला आहे, त्यांत शककालाविषयीं वृत्तांत लिहिला आहे त्यांत कोरूरच्या लढाईविषयीं वर्णन केलेलें आहे तें येणेंप्रमाणें.—शकनांवाचा राजा होता, त्याचें राज्य

सिंधुनदापासून समुद्रापर्यंत होतें. तो हिंदुजातीचा नसून पश्चिमेकडील देशांत जन्म पावलेला होता. त्याचें राहण्याचें ठिकाण सर्व राज्याच्या मध्यभागीं आर्यावर्तनामक देशांत होतें. तो मोठा जुलुमी राजा होता. विक्रमादित्यानें त्यावर स्वारी करून त्याची फौज पळवून लाविली. आणि मुलतान आणि पंजाबांत लुनई नांवाचा एक किल्ला आहे त्यांच्या दरम्यान कोरूर नांवाचा देश आहे, त्यांत त्या शकराजाला ठार मारलें. त्या गोष्टीनें लोकांना फार आनंद होऊन तो त्याच्या मृत्युचा काल फार विख्यात झाला. आणि मुख्यत्वें ज्योतिष्यांनीं तो काल-गणनेला आरंभक काल म्हणून स्वीकारला. अस्तु, वर लिहिल्याप्रकारेंच म्हणजे १०×१००=१००० इतकीं वर्षें मिळवून दुसरा एक हर्ष नांवाचा ख्रि० पू० ४५६ व्या वर्षीं सुरू होणारा काल स्थापिला होता, परंतु तो कधींही वहिवाटींत आलेला दिसत नाहीं.

हें मिस्टर फर्गस्सन ह्यांचें म्हणणें सत्यप्रायसें दिसतें. त्यावरून सहाव्या शतकांतील विक्रमाविषयीं मूलतः लोकें जें म्हणत तें सर्व, ख्रि० पू० ५६ व्या वर्षी सुरू होणाऱ्या संवतकाळाचा विक्रमादित्य असा एक नांवाचा कल्पित संस्थापक मानून, त्याविषयीं लोक कां म्हणूं लागले असतील ह्याचा संदर्भ लावतां येतो. ज्या सहाव्या शतकांतील विक्रमादित्यानें तो संवतकाल प्रथम उत्पन्न केला त्यालाच त्याच्या कारकीर्दीच्या कालाच्या मागें ६०० वर्षें लोटला असावा. कारण त्या सहाशें वर्षांच्या कालावधींत पाहूं जातां असल्या प्रकारचा राजा होऊन गेल्याचें कांहीं, संस्मारक-इमारत, नाणीं, किंवा लेखी इतिहास, अशा प्रकारचें बिलकूल प्रमाण वास्तविक उपलब्ध नाहीं.

कोणी म्हणतात अल्बिरुनीच्या लेखाशिवाय, पूर्वी सांगितलेल्या कोरूर एथील लढाई-विषयीं दुसरें कांहीं प्रमाण अद्यापि मिळत नाहीं, हें खरें, परंतु अल्बिरुनी कल्पनेच्या लढाया कशाला लिहील. त्याला लोकांनीं जें सांगितलें असेल तें त्यानें लिहिलें. असल्या प्रकारच्या संशयांनीं किंवा आक्षेपांनीं फर्गस्सन ह्यांच्या पक्षाचा मोड होण्याचा संभव नाहीं. ज्या कालीं ती लढाई झाली म्हणून अल्बिरुनीचा लेख आहे, त्या कालचें प्रमाण कोणीं कांहीं दाखवील तर ती लढाई झाली नाहीं असें म्हणतां येईल. फर्गस्सनच्या पूर्वीही कांहीं अन्य लोकांनीं त्यानें काढलेल्या तोडीची कल्पना केली होती, परंतु फर्गस्सनप्रमाणें धीरानें स्पष्टपणें त्यांनीं तिचें समर्थन केलें नाहीं. फर्गस्सनला दोष पुष्कळ देतात, परंतु, त्यांचें मत खरें असो किंवा खोटें असो, त्यांचें धैर्य तारीफ करण्यासारखें आहे. आम्हांला त्यांचें धारिष्ट वावगें दिसत नाहीं. त्यांचा पक्ष खोटा ठरेल तर, त्यापासून फायदा इतका होईल कीं, दुसऱ्यानें पुनः तो पक्ष कोणी धरणार नाहीं. बरें तो पक्ष खरा ठरला तर इतरांना त्यापुढें जाण्याला मार्ग होईल.

तेव्हां सांगावयाचें तात्पर्य इतकेंच. फर्गस्सन ह्यांचें निर्भरानें म्हणणें आहे कीं, संवतकाल हा सहाव्या शतकापूर्वी उत्पन्न होऊन प्रचारांत आलेला नव्हता. तेव्हां ही गोष्ट सद्धच आहे कीं, तो सहाव्या शतकाच्या पूर्वींच्या कोणत्याही ऐतिहासिक लेखांत आढळूं नये; आणि संवत ५४३ च्या मितीचा एक शिलालेख किंवा नाणें सांपडून कोणी पुढें

आणून दाखवील तर फर्गस्सनच्या कल्पनेची सारी इमारत एकदम ढांसळून कोसळून पडेल.

अस्तु. हा वाद कांहीं कालपर्यंत चालू आहे. डाक्टर भाऊ दाजी, ह्यांनीं पुष्कळ शोध करून असा सिद्धांत लिहून ठेवला आहे कीं, ख्रिस्तीसनाच्या ११ व्या शतकाच्या पूर्वीच्या एकाही शिलालेखावर किंवा ताम्रलेखावर विक्रमसंवतकालाची मिति नाहीं; आणि विक्रमसंवतकाल हा, अनहिलपुरच्या राजकुलाची गुजराथेंत स्थापना होऊन जैनधर्माचें पुनरुज्जीवन झाल्यानंतर प्रवृत्तींत आला. मिस्टर फर्गस्सन ह्यांची प्रथम कल्पना अशी होती कीं, धारचा भोजराजा ह्याच्या कारकीर्दींत (म्हणजे इ० स० ९९३ त ) किंवा किंबहुना पुनः—प्राप्त—राज्य—चालुक्यकुलांतील राजांनीं ( म्हणजे इ० स० १००३ त ) विक्रमसंवताची कृति निघाली. परंतु ह्या कल्पनेनें फारच मर्यादातिक्रम होतो. जनरल् कनिंघम, सर वाल्टर एलिअट, वगैरे दुसऱ्या अनेक विद्वानांनीं विक्रमसंवतकाल केव्हांपासून प्रघातींत आला, ह्या गोष्टींविषयीं ताम्रलेख व शिलालेख ह्यांचीं प्रमाणें दाखविलीं आहेत, परंतु तीं आठव्या शतकाच्या पुढील काळचीं आहेत. तेव्हां अर्थात्, विक्रमसंवत ६०० च्या पूर्वींच्या मितीचा समकाललेख कांहींतरी मिळाल्याखेरीज दुसऱ्या कशानें फर्गस्सन ह्यांच्या पक्षाचें वास्तविक पाहतां खंडण होण्यास शक्य नाहीं, आणि तसल्या मितीचा लेख अद्यापि कोणास सांपडला नाहीं.

आमचे विद्वान मित्र डाक्टर ब्युइल्हर ह्यांचा अद्यापि दृढ ग्रह आहे कीं, विक्रमादित्य ह्या नांवाचा राजा ख्रिस्तीसनाच्या आरंभापूर्वीं झाला होता, आणि त्यानेंच तो ख्रि० पू० ५६ व्या वर्षीं आरंभ होणारा संवतकाल स्थापला. त्यांनीं बहुत वर्षें हिंदुस्तानांतील कोरींव लेखांचा अभ्यास करण्यांत घालविलीं आहेत, व अनेक कोरींवलेख पाहिले आहेत. एक तरी संवत ६०० च्या अथवा इ० स० ५४४ च्या पूर्वींच्या काळचा लेख मी दाखवीन म्हणून त्यांची कासाविशी आहे. डाक्टर भाऊ दाजी म्हणतात कीं, ११ व्या शतकापूर्वींचा संवतकालच्या मितीचा एकही लेख नाहीं. हें म्हणणें डाक्टर ब्युइल्हर तेव्हांच रद्द करूं शकतील; कारण सामानगड एथील कोरींवलेख आहे त्याची मिति विक्रमसंवतकालाप्रमाणें इ० स० ७५४ ही निघते; ह्याशिवाय, पाटण एथील कोरींवलेख आहे, तो संवत् ८०२ म्हणजे इ० स० ७४६—ह्या मितीचा आहे असें डाक्टर ब्युइल्हर ह्यांनीं दाखविलें आहे. परंतु डाक्टर बर्जेस म्हणतात कीं, तो खरा असण्याविषयीं शंका आहे. ह्या प्रकारची डाक्टर ब्युइल्हर ह्यांनीं पुष्कळ खटपट केली, तथापि इ०स०७५४ म्हणजे संवतकालाच्या सुरुवातीपासून ८१० वर्षांपूर्वीं, तो काल ज्यांत वापरला आहे असा लेख ते अद्यापि दाखवूं शकले नाहींत. त्यांनीं कावी एथील लेख दाखविला आहे, परंतु त्याविषयीं फार शंका आहेत, आणि तो संवतकालच्या मितीचा आहे असें खास सिद्ध होत नाहीं. त्या लेखांविषयीं सुद्धां ही अडचण राहतेच कीं—संवतकाल सुरू झाल्यापासून निदान ६०० वर्षें तरी तो प्रघातींत आला नव्हता.

# उज्जयिनीचा विक्रमादित्य हर्ष ह्याचा काल.

डाक्टर भाऊ दाजी व मिस्टर फर्गस्सन् ह्या उभयतांच्या मताप्रमाणें उज्जयिनीचा विक्रमादित्य, ज्यानें संवतकालाची कृप्ति प्रथम काढून तो चालू केला, त्याचा वास्तविक काल कसा निश्चित करतां येतो तो पाहूं. ह्यूएन थ्संग नांवचा चीन देशांतील यात्रेकरू ह्या देशांत आला होता. त्याच्या ह्या देशांतील प्रवासाच्या साऱ्या काळांत उत्तर हिंदुस्तानांत शिलादित्य ( ऊर्फ हर्षवर्धन कुमारराज ) नांवाचा सार्वभौम राजा कान्यकुब्ज एथील गादीवर होता. त्याच्या प्रवासाचा काळ इ० स० ६२९ पासून ६४५ पर्यंत असा ठरलेला आहे. ह्यूएन थ्संग ह्यानें शिलादित्याचा निरोप घेतला तेव्हां शिलादित्याच्या कारकीर्दीचीं ३० वर्षें होऊन गेलेलीं होतीं. आणि ते समयीं त्यानें आपलें सहावें पंचवार्षिक मोक्षमहापरिषद् नांवाचें मंडल जमविलें होतें. तेव्हां शिलादित्याच्या कारकीर्दीचा आरंभ इ० स० ६१० त, व समाप्ति सुमारें इ० स० ६५० त, झाली असें ठरतें. तो जातीनें वैश्य होता.

ह्या शिलादित्याचा बाप प्रभाकर ( ऊर्फ प्रभाकरवर्धन ) नांवाचा, आणि त्याचा वडील भाऊ राज्यवर्धन नांवाचा होता. ते उभयतां त्याच्या पूर्वीं गादीवर होते. राज्यवर्धनाचा, कर्णसुवर्णाचा राजा शशांक ह्यानें पराभव करून त्याला ठार मारलें होतें. तो शशांक बौद्धधर्मी लोकांचा शत्रु होता. राज्यवर्धनाच्या मृत्यूनंतर शिलादित्य हा गादीवर बसला. त्यानें महाराज हा किताब न घेऊन कुमारराज असा किताब धारण केला. तो बौद्धधर्मी होता, त्यामुळें त्यानें मांसाहार अगदीं मना केला होता. त्याचा प्रधान भंडि नांवाचा होता. हा वृत्तान्त ह्यूएन थ्संगानें प्रत्यक्ष पाहून लिहिलेला आहे. त्याचें दृढीकरण बाणकवीनें आपल्या हर्षचरित नामक ग्रंथांत केलेलें आहे. ह्या हर्षचरितांतलाही वृत्तान्त प्रत्यक्ष पाहणारानेंच लिहिलेला आहे. त्यांत थोडा फरक इतकाच आहे कीं, हर्ष ऊर्फ हर्षवर्धन शिलादित्य हा, प्रतापशील राजा व त्याची राणी यशोवती ह्या दंपत्याचा पुत्र होता असें लिहिलें आहे. त्याच्या भावाचें नांव तर राज्यवर्धन हेंच लिहिलेलें आहे. प्रभाकरवर्धन हा सूर्याचा उपासक होता, व त्याचा बाप पुष्पभूति हा शिवाचा उपासक होता. प्रभाकरवर्धनाचा गुरु माधवगुप्त, ज्योतिषी तारक, आणि वैद्य सुषेण होता. प्रभाकरवर्धन आणि त्याचा भाऊ ह्यांना भंडीनें विद्या शिकविली. त्या उभयतांची बहीण राज्यश्री नांवाची होती, ती गृहवर्म ह्याला विवाह करून दिलेली होती. तो गृहवर्म, प्रभाकराचा माळव्याच्या राजानें पराभव केला त्याच दिवशीं, लढाईत मारला गेला. पुढें त्या माळव्याच्या राजाला राज्यवर्धनानें ठार मारलें. तदनंतर राज्यवर्धन ह्याला गौडराज गुप्त ह्यानें जिंकलें; तेव्हां हर्ष ( ऊर्फ हर्षदेव अथवा हर्षमल्ल ) हा गादीवर बसला. भंडीनें मालवांस जिंकून राज्यश्रीला सोडविलें. हर्षानें प्राक् ज्योतिषचा भास्करवर्म ह्याच्याशीं सख्य जोडिलें. हा भास्करवर्म, आणि कामरूप देशाचा राजा भास्करवर्म, ज्याला ह्यूएन थ्संग भेटला होता, हे एकच.

राज्यवर्धन आणि प्रभाकर ह्यांच्या कारकीर्दींचा काळ सांगितला नाहीं, तथापि, ज्यापक्षीं इ० स० ६४० च्या सुमारास शिलादित्याच्या कारकीर्दीचीं ३० वर्षें भरून

गेलेलीं होतीं, आणि त्या काळाच्या ६० वर्षें पूर्वी शिलादित्य प्रतापशील गादीवर होता असा लेख आहे, त्यापक्षीं, मिस्टर फर्गस्सन हे, शिलादित्य प्रतापशील ह्याच्या कारकीर्दीची समाप्ति इ० स० ५८० त मांडावी असें म्हणतात. त्यानें प्रभाकरवर्धन व राज्यवर्धन ह्यांच्या कारकीर्दींना इ० स० ५८० पासून ६१० पर्यंत सुमारें ३० वर्षें राहतात. शिलादित्य प्रतापशीलानें इ० स० ५३० पासून ५८० पर्यंत ५० वर्षें राज्य केलें; आणि त्याच्या पूर्वी विक्रमादित्य (श्रावस्ती एथें) राजा होता. त्याची कारकीर्द इ० स० ५३० त संपलेली असली पाहिजे.

आतां प्रभाकरवर्धन व राज्यवर्धन ह्यांच्या कारकीर्दींना ३० वर्षें द्यावीं हें जें फर्गस्सन ह्यांचें मत त्यानें निष्कारण अडचण उत्पन्न होते. ह्युएन थ्सँग हा, इ० स० ६४० च्या ६० वर्षें पूर्वी शिलादित्य गादीवर होता असें म्हणतो, ह्याहून ज्यास्ती कांहीं म्हणत नाहीं. जर शिलादित्याला इ० स० ५५० पासून ६५० पर्यंत वर्षें दिलीं तर, इ० स० ६४० पूर्वी त्यानें ६० वर्षें राज्य केलें हें म्हणणें, तितकेंच खरें झालें असतें. त्यायोगें १० वर्षें प्रभाकरवर्धन व राज्यवर्धन, जे दोघेही दुसऱ्याच्या हातून मरण पावले, त्या दोघांस मिळून राहतील; आणि कोरूरची लढाई, विक्रमसंवतकालाची सुरुवात, व काश्मीरच्या गादीवर मातृगुप्त ह्याची नेमणूक, ह्या गोष्टी विक्रमादित्याच्या कारकीर्दीच्या काळांत येतील. त्याची कारकीर्द इ० स० ५५० पर्यंत लांबेल. ६० वर्षें हीं हजारवांड्यांनीं बार्हस्पत्यमानाचीं असावींत.

वरील विवेचनावरून जे काल वगैरे निश्चित होतात त्यांची सांखळी येणेंप्रमाणें:—

**—५५०—उज्जयिनीचा विक्रमादित्य.**

५३१–५७९—खुश्रू नुशोरवान आणि वर्झोई.

५४४—कोरूर एथील लढाई. ख्रि. सना पूर्वीच्या ५५ व्या वर्षापासून सुरू होणाऱ्या संवतकालाच्या आरंभापासून ६०० वर्षांनीं.

सिद्धसेनसूदि–हा तो काल गणितानें सिद्ध करण्याच्या कामांत साहाय्य करितो.

५४४—मातृगुप्त काश्मीरचा राजा, आणि भर्तृमेंथाचा समकाल.

कालिदास हा, दिग्नाग, वसुबंधु, आणि असंग, ह्या तिघांचा समकाल. भारवी समवेत एका इ० स० ६३४ ह्या मितीच्या कोरींव लेखांत त्याचा उल्लेख आहे. त्याच्या सेतुकाव्याची सहाव्या शतकांतील दंडीनें तारीफ केली आहे. त्याच्या काव्यांत भास, सौमिल्ल, ह्यांच्या ग्रंथांचे उतारे आहेत.

वराहमिहिर.—इ० स० ५८७ त मेला.

त्यानें इ० स० ४७६ त जन्मलेला आर्यभट्ट, इ० स० ५०५ तील श्रीषेन ह्याचा लाट, वसिष्ठ,

विजयनन्दी, इत्यादिकांच्या ग्रंथाधारें लिहिलेला रोमक सिद्धांत, पौलसअल्युनानी ह्याचा पौलिश सिद्धांत, विष्णुचंद्राचा वसिष्ठ सिद्धांत, सौर सिद्धांत; पैतामह सिद्धांत, तसेच सत्यभादन्त, बादरायण, इत्यादि ग्रंथकार, ह्यांचा उल्लेख केलेला आहे.

अमरसिंह—ह्याच्या कोशाचें भाषांतर चिनई भाषेंत इ० स० ५६१ पासून ५६६ पर्यंतच्या कालांत झालें.

जिष्णु—बृह्मगुप्ताचा बाप.—ह्याचें जन्म इ० स० ५९८ त झालें.

दिग्नाग.—ह्याजवर उद्योतकर ह्यानें टीका केली. उद्योतकराविषयीं सुबंधूनें उल्लेख केला आहे. सुबंधूविषयीं बाणानें उल्लेख केला आहे.

मनोरथ.—हा वसुबंधुचा गुरु—ह्याला इ० स० ९०० त पदभ्रष्ट केलें.

५५०-६००—**शिलादित्य प्रतापशील** ( मालव ) ह्यालाच फिरिस्ता भोज असें म्हणतो.

वसुबंधु—ह्याला पुनः स्वस्थानापन्न केलें. तो नालंद एथें पंडित होता, तो असंगाचा भाऊ; तो इ० स० ५६९ सालाच्या पूर्वी मरण पावला.

प्रभाकरवर्धन—माधवगुप्त, तारक, सुषेण, हे त्याच्या दरबारीं होते.

राज्यवर्धन—(ज्येष्ठ पुत्र) तो मालव देशच्या राजाचा पराभव करितो. कर्ण सुवर्णचा राजा शशांक ऊर्फ गौडदेशचा गुप्त त्याचा पराभव करितो. तो कर्णसुवर्णचा राजा बुद्धाचा शत्रु होता.

फैतु—चीनचा वकील ( इ० स० ६०५. )

६१०-६५०—**शिलादित्य हर्षवर्धन** ( हा कनिष्ठ पुत्र ) ह्याला कुमारराज म्हणत. तो जातीनें वैश्य होता. त्याची बहीण राज्यश्री ही गृहवर्मांची बायको. गृहवर्माला मालवराजानें ठार मारलें. त्याचा प्रधान भंडि हा होता. त्यानें प्राक्ज्योतिषचा (कामरूपाचा) कुमार भास्करवर्म ह्याच्याशीं सख्य केलें.

महाराष्ट्राचा राजा दुसरा पुलकेशी—ह्याच्याशीं युद्धें. ह्यूएनथ्संगाचा काळ ( इ० स० ६१८–६२५ पर्यंत. )

दुसरा पुलकेशी सत्याश्रय ह्यानें त्याचा पराभव केला. तो पुलकेशी इ० स० ६०९ त राज्य करूं लागला.

चिनांतून मगध देशाच्या राजाकडे येण्याकरितां इ० स० ६४८ त वकीलमंडळ निघतें. ते शिलादित्याच्या मरणानंतर पोहोंचतें.

शिलादित्याची आणि ह्यूएनथ्संग ह्यांची भेट इ० स० ६२९–६४५ ह्यांच्या दरम्यानच्या काळांत होते. त्याची आलोपेन ह्यांच्याशीं भेट इ० स० ६३९ त होते.

दण्डी.—दशकुमारचरित, काव्यादर्श.

सुबंधु.—वासवदत्ता, तिचा बाणानें उल्लेख केलेला आहे. तो उद्योतकर, धर्मकीर्ति ( असंगाचा शिष्य ) ह्यांच्या ग्रंथांतील उतारे घेतो.

बाण.—हर्षचरित, कादंबरी, चंडिकास्तोत्र, रत्नावलि ( धावक ? ) पार्वतीपरिणय.

मयूर.—मयूरशतक.

मानतुंगसूरि.—भक्तामरस्तोत्र.

नारायण.

आढ्यराज.

भर्तृहरि.—इ० स० ६५० त मरण पावला (इत्सिंग).

जयादित्य.—( काशिका ) इ० स० ६६० त मरण पावला ( इत्सिंग ).

ब्रह्मगुप्त.—इ० स० ५९८ त जन्म पावला.

ह्या कालदर्शक सांखळींतील कांहीं कड्या किंवा सांधे अजून कांहींसे संशयित आहेत हें खरें, तथापि ख्रि० पू० च्या पहिल्या शतकांत कोणीएक विक्रमादित्य नांवाचा राजा होता ही काल्पनिक श्रद्धा कशी उत्पन्न झाली ह्याचें तिजवरून बरेंच कारण सांगतां येईल. बाकी तो खरोखर सहाव्या शतकांत होता ह्या गोष्टीविषयीं तर शंका अगदींच उरत नाहीं.

## शककाल.

दुसरा एक काल आहे त्याला शककाल असें म्हणतात. त्याचा 'संस्कृत विद्येचें पुनरुज्जीवन' ह्या आमच्या विषयाशीं प्रत्यक्ष संबंध तर थोडाच आहे हें खरें, तथापि त्याच्याकडे अगदींच अलक्ष्य करून उपयोग नाहीं. ह्याचीं दोन कारणें आहेत. (१) तो काल इ० स० ७८ पासून सुरू होतो ह्यास्तव, उत्तरेकडून हिंदुस्तानावर स्वाऱ्या होत असत त्या तेव्हांपासून बंद झाल्या अशी बहुशः लोक कल्पना करितात, आणि कित्येक विद्वानांनीं देशी राज्य आणि देशी विद्या ह्यांचें हिंदुस्तानांत पुनरुज्जीवन

होण्याला तेव्हांपासून सुरुवात झाली असें ठरविलें आहे. ह्या कालाविषयींही मिस्टर फर्गस्सन ह्यांची एक फारच छान कल्पना आहे, ती लक्ष्यांत आणली पाहिजे. पूर्वींची संवतकालाविषयींची त्याची कल्पना जितक्या त्वरेनें आम्हीं स्वीकारली तितक्या त्वरेनें आमच्यानें ती कल्पना स्वीकारवत नाहीं हें खरें, तथापि, तींत सत्याचा बराच मोठा अंश आहे. मिस्टर फर्गस्सन ह्यांना संस्कृत येत नसतां ह्या भाषेविषयीं पंडित म्हणविणाऱ्यांच्या ध्यानीं मनीं कधींही आल्या नाहींत अशा दोन मुद्द्याच्या गोष्टी त्यांच्या लक्ष्यांत आल्या. त्या ह्या. (१) हिंदुस्तानांत शककाल हा स्मारक बांधणावळींच्या संबंधानें पाहतां, विक्रम संवतकालाच्या पूर्वींपासून प्रवृत्तींत आहे; आणि ( २ ) तो काल, हिंदुस्तानांत शकांच्या कारकीर्दीच्या समाप्तीचा समय न दाखवितां, हजार वांव्यांनीं कनिष्क नामक हिंदुस्तानांतील सार्वभौम शक राजाचा राज्याभिषेकसमयाच्या सुमारास सुरू झाला असावा असें दाखवितो.

ह्यांतील पहिल्या गोष्टीविषयीं शंका येण्याला थोडीच जागा आहे. दुसऱ्या गोष्टीविषयीं शंका ही येते कीं, कनिष्काचा राज्याभिषेकसमय इ० स० ७८ तच बरोबर येऊन पडतो? किंवा संवतकालाप्रमाणें तो शककाल त्या राजाच्या कारकीर्दीच्या सुरुवातीच्या समयाजवळ जाऊन पोहोंचावा अशी कांहीं कल्पना योजून ठरविलेला आहे ? मिस्टर फर्गस्सन ह्यांनीं ज्या गोष्टी शाबीत केल्या आहेत त्यांत ऐतिहासिक बल बरेंच आहे, आणि त्यांवरून इतकें स्पष्ट होतें कीं, लिपींतील मूलाक्षरें व नाणीं पाडण्याची किंवा करण्याची युक्ति, ह्यांच्या ज्ञानाप्रमाणेंच, कालगणनापद्धति (आम्ही ज्या प्रकारची ती समजतों त्याप्रकारची ) हिंदुस्तानांत परदेशांतूनच आली असली पाहिजे. कालगणना पद्धतीला अनुसरून ज्यांवर मिति मांडल्याचीं कांहीं चिन्हें आहेत, असे अगदीं पहिले लेख म्हटले म्हणजे अशोक राजाचे कोरींव लेख होत, आणि त्यांपुढील कनिष्क राजाचे लेख होत. त्या दोघांही राजांनीं आपल्या कोरींव लेखांवर, पुढील कालाकडे लक्ष्य न देतां, किंवा ऐतिहासिक कालांचे संस्थापक होण्याची इच्छा न करतां, केवळ आपल्या कारकीर्दीचीं वर्षें मांडलेलीं आहेत. कनिष्कानें तर, जणूं कीं त्याचे कोरींव लेख करण्यांत परदेशीय कल्पनांचें अंग आहे ह्याविषयीं संशय राहूंच नये अशा हेतूनेंच कीं काय, त्या लेखांवर आपल्या अक्षरांशिवाय ग्रीक अक्षरें घातलेलीं आहेत, आणि ग्रीक महिन्यांचीं नांवेंही कोरलेलीं आहेत. उदाहरण, भावलपुर एथील कोरींव लेखांत ' महाराजस्स राजाधिराजस्स देवपुत्तस्स कनिष्कस्स संवत्सरे एकादशे संव० ११ दैसिसस्स मासस्स दिवसे अट्ठाविसे २८. असे शब्द आहेत.' त्यांतील दैसिस हें मासाचें नांव ग्रीक मास दैसिआस हें आहे.

हें सर्व स्वाभाविक आणि ऐतिहासिकरीत्या पूर्णपणें ध्यानांत येण्याजोगें आहे. ह्या मितींना कांहीं ज्योतिषशास्त्रीय किंवा ठरलेल्या कालगणनापद्धतीच्या कल्पनांचा बिलकूल आधार नव्हता. काय जो प्रकार झाला तो इतकाच कीं, कनिष्काच्या कारकीर्दींत झालेल्या कोरींव लेखांत ' कनिष्क महाराजाच्या नवव्या वर्षीं ' ( महाराजस्स कनिष्कस्स संवत्सरे नवमे ) असल्या प्रकारचे शब्द आहेत; त्याच्या पुढील राजांच्या कोरींव लेखांत तींच वर्षें वाढविलेलीं आहेत. उदाहरण, ' वासुदेवाच्या ८३ व्या वर्षीं ' (महाराजस्स वासुदेवस्स सम्० ८३ ) असें आहे, तेथें वासुदेवाच्या कारकीर्दीच्या ८३

सं.नि. ७



व्या वर्षीं असा अर्थ नाहीं; तर ( कनिष्काच्या राज्याभिषेकसमयापासून ) वासुदेवाच्या ८३ व्या संवत्सरीं असाच अर्थ घ्यावयाचा.

## कनिष्काचा काल.

एतदनंतर प्रश्न उत्पन्न होतो कीं, महाराज शकराज कनिष्क हा शककालाचा न कळतां संस्थापक झाला असें मानावें कीं काय? म्हणजे इ० स० ७८ साला इतक्या आधुनिक कालीं त्याला राज्याभिषेक झाला कीं काय?

मिस्टर फर्गस्सन ह्यांनीं सिद्ध करून दाखविलें आहे कीं, मानिक्याल एथील स्तूप कनिष्कानें बांधविला असें मानतात, त्यांत रोमन नाणीं सांपडलीं त्यांवरून, ती इमारत खि० पू० ४३ व्या वर्षाहून प्राचीन नाहीं इतकेंच फार तर ठरेल, परंतु ती त्या सालाच्या आलीकडली किती आहे ह्याचा निर्णय होऊं शकणार नाहीं; आणखी त्या रोमन डिनारी नांवाच्या नाण्यांच्या स्थितीची त्यांच्या बरोबर सांपडलेल्या कनिष्काच्या नाण्यांच्या स्थितीशीं तुलना करून पाहिलें तर असें साफ दिसतें कीं, तीं डिनारी नाणीं त्या स्तूपांत प्रथम घातलीं असतील तेव्हां, त्यांचा फार दिवस वापर होऊन झिजून गेलेलीं असलीं पाहिजेत. मिस्टर फर्गस्सन ह्यांचा दुसरा मुद्दा जरी अप्रतिहार्य नाहीं, तरी फारच चतुराईचा आहे. गोन्डोफयारेझ ह्याचा अंमल हिंदुस्तानच्या वायव्येकडील प्रांतांवर होता. त्याचीं नाणीं कनिष्काच्या नाण्यांहून निःसंशय प्राचीनकाळचीं आहेत. ह्या खऱ्या ठरलेल्या गोष्टीचा आधार घेऊन मिस्टर फर्गस्सन म्हणतात कीं, गोंडोफयारेझला सेन्ट टामस हा भेटला होता, ही कादम्बरी ज्यांनीं रचली आहे, त्यांना गोन्डोफयारेझ हा खिस्ताच्या मृत्यूनंतर होऊन गेला ही गोष्ट पक्की माहीत असली पाहिजे; ह्यास्तव अर्थात् नाण्यांवरून गोंडोफयारेझहून उत्तरकालिक सिद्ध होणारा जो कनिष्क तो खिस्ताच्या पूर्वींच्या शतकांत होऊन गेला असें कसें म्हणतां येईल?, आणि त्याच्या कारकीर्दीचीं वर्षें खि० पू० ५६ व्या सालीं सुरू होणाऱ्या विक्रमसंवताचीं कशीं म्हणतां येतील.

आणखी एक मुद्दा आहे, तो हा. जल्लालाबादेजवळील आहीनपोश नांवाच्या स्थळीं स्तूप आहे तो मिस्टर सिम्पसन ह्यांनीं खोदून तपासला. त्यांत क्याड्फीसेझ, कनिष्क, आणि हुविष्क ह्या तिघांचीं कोरीं नाणीं, व त्यांबरोबर डोमिशन, ट्रेजन, आणि ह्याड्रिअनची राणी, बादशाहीण स्याबिना ह्यांचीं नाणीं सांपडलीं. त्यांवरून इतकें सिद्ध होतें हें खरें कीं, इ० स० १२० सालाच्या पूर्वीं ती इमारत बांधलेली नसावी. परंतु हुविष्क राजा, त्याच्या मिति शककालापासून म्हणजे (इ० स०७८) पासून मानल्या तर, त्याचा काल ७८+४८=१२६ इ० स० हा ठरेल, व तो स्वतः बादशाहीण स्याबिना हिचा समकाल असावा असें ठरेल. ही गोष्ट, हुविष्कानें तो स्तूप बांधविला असें शाबित होई तोंपर्यंत केवळ लक्ष्यांत ठेवण्याजोगी आहे, इतकेंच, ह्याहून तिजपासून ज्यास्ती कांहीं सिद्ध होत नाहीं.

अल्लीमस्जिद एथील स्तूपांत वासुदेवाचीं नाणीं सांपडलीं त्यांविषयींही हाच प्रकार आहे. जरी शिल्पविषयक प्रमाणानें तो स्तूप दुसऱ्या अथवा तिसऱ्या शतकाच्या पूर्वींचा नाहीं असें ठरलें, तथापि, तो स्तूप वासुदेवानें बांधविला हें सिद्ध झालें पाहिजे.

अस्तु, आतां विक्रमसंवताविषयीं ज्या शंकेचें उत्तर द्यावें लागलें होतें तीच शंका शककालाविषयींही येते ती ही कीं, जर शककालानें शक सर्व हिंदुस्तानांत खरोखर मान्य झाले असतील तर तो शककाल शकराजांच्या विनाशाचा समय असें लोक कसें मानूं लागले असावेत? आमचा समज असा आहे कीं, शकांच्या विनाशाच्या समयापासून शककालाची सुरुवात ही कल्पना इ० सनाच्या आठव्या शतकापर्यंत उत्पन्न झालेली नव्हती. ही गोष्ट सप्रमाण प्रथम डाक्टर भाऊ दाजी ह्यांनीं दाखविली. आर्यभट्ट ह्यांचें जन्म इ० स० ४७६ त झालें. त्याला विक्रमसंवतकाल व शककाल ह्या दोहोंतून एकही माहीत नव्हता. वराहमिहिरानें प्रथम शककालाचा उल्लेख केलेला आहे, तरी त्याला त्यानें शकभूपकाल अथवा शकेन्द्रकाल इतकेंच म्हटलेलें आहे. ब्रह्मगुप्त हा इ० स० ५९८ त जन्म पावला. त्यानें शकनृपान्ते असे शब्द योजलेले आहेत, असें मि० कोल्ब्रूक लिहितात. परंतु भास्करावर एक टीकाकार आहे, त्यानें शकनृपान्ते ह्या शब्दांचा अर्थ, 'विक्रमादित्यानें शक नांवाच्या रानवट लोकांचा संहार केला, त्याच्या कारकीर्दीच्या किंवा आयुष्याच्या समाप्तीच्या समयीं' असा केला आहे. हा टीकाकार कांहीं कां म्हणेना, परंतु ब्रह्मगुप्तानें सांगितलेला काल इ० स० ७८ त आरंभ होणारा जो तोच आहे; आणि ब्रह्मगुप्तानें शकनृपान्ते असें जें म्हटलेलें त्याचा हजार वांच्यांनीं आशय शाक असाच असावा, आणि शक राजांच्या समाप्तिकालीं अशा अर्थी ते शब्द योजलेले नसावेत.

## शकारिविषयीं दंतकथा.

आम्हांला असा संशय वाटतो कीं, शक राजालाच शत्रु मानून तो शकांला जिंकणारा असें मानणें ही जी गैरसमज ती शकारि ह्या शब्दापासून उत्पन्न झाली असावी. आधुनिक ग्रंथकारांनीं, आम्हीं ज्या कशाला इतिहास असें म्हणतों त्याचें कांहींच ज्ञान नसल्यामुळें, शकारि म्हणजे शकांचा ( अरि ) शत्रु हा जो उघड अर्थ तोच घेतला असावा, आणि कदाचित् शकारि शब्दाचा मूलार्थ शक शब्दाचाच अपरपर्याय असेल जसें, पुल्लिंगीं शकार, आणि स्त्रीलिंगीं शकारी ( गणना ).

दुसरीही एक कल्पना आहे. शकार किंवा शाकार हा शब्द शक शब्दापासून उत्पन्न होऊन शककुलोत्पन्न अथवा शकवंशोत्पन्न ह्या अर्थी मूलतः वापरीत असतील. पाणिनीला शकलोक व शकराजे माहीत होते असें दिसत नाहीं. परंतु तो एक 'आर' हा अपत्यवाचक प्रत्यय आहे असा नियम सांगतो, व त्यावरून गोधा ह्यावरून गौधार असें रूप होतें असें म्हणतो. त्या नियमाप्रमाणें शक ह्यावरून शाकार असें रूप होण्यास शक्य आहे. आम्हीं ह्यासंबंधीं आणखी ज्यास्ती बोलूं इच्छीत नाहीं परंतु, पुढील वैयाकरणांस शाकारी भाषा आढळली असेल तेव्हां त्यांनीं त्या नांवाची व्युत्पत्ति 'शकारांची जी भाषा' अशी केली असेल, आणि वस्तुतः तर ती शक व त्यांचे वंशज ह्यांची भाषा म्हणून मूलतः वापरीत असतील हें सर्व शक्य आहे. असें असेल तर शाकार काल किंवा शाकारी काल हा मूळचा शक व त्यांचे वंशज ह्यांचा काल असून पुढील काळीं शकांच्या शत्रूचा काल असा त्याचा अर्थ होणें हेंही तितकेंच शक्य आहे. ह्याच्या साम्याचें 'सुल्बार' हें उदाहरण आहे. मूलतः तें

सल्फर ह्या शब्दाचें संस्कृत रूप झालेलें असावें, परंतु त्याचा अर्थ पुढें ' सुल्ब' ह्याचा शत्रु असा होऊं लागला. सुल्ब ह्याचा अर्थ तांबें असा कल्पिलेला आहे. ( पिटर्सबर्ग कोश पहा. )

आतां, शककाल म्हणजे इ० स० ७८ सालीं आरंभ पावणारा काल, व कनिष्क राजाच्या राज्याभिषेकाचा काल एक होता काय ह्या प्रश्नाकडे पुनः वळूं. आम्हांला ह्या गोष्टीविषयीं फार शंका वाटते हें स्पष्ट कबूल केलें पाहिजे. कनिष्काचीं सांपडलेलीं वर्षें केवळ ऐतिहासिक आहेत, परंतु शककालाचीं वर्षें, (त्यांचा आरंभ एककालींच होत असला तथापि) विक्रम संवतकालासारखीं मूलतः कालगणना पद्धतीला अनुसरून गणून ठरविलीं असतील. प्रोफेसर ओल्डेन्बर्ग ह्यांनीं फर्गस्सन ह्याच्या कल्पनेसारखीच कल्पना केलेली आहे. परंतु त्यांच्या कल्पनेनें आमची खातरी होत नाहीं. प्रोफेसर ओल्डेन्बर्ग आपल्या सिद्धांताला आधार म्हणून बादामी एथील शिलालेख दाखवितात. त्यांत ' शकराजाच्या राज्याभिषेकापासून ५०० वर्षें गेल्यावर ' असे शब्द आहेत; आणखी त्यांनीं इतर कोरींव लेख प्रमाणादाखल दाखविले आहेत, त्यांत ' शक नृपकालाचें वर्ष ' असे शब्द आहेत. युएह-ची. लोकांनीं ख्रि० पू० २४ व्या सालाच्या सुमारास हिंदुस्तानांत प्रथम काईम ठाणें घातलें. त्या कालाच्या, आणि कनिष्काच्या राज्याभिषेक समयाच्या ( म्हणजे त्यांच्या मताप्रमाणें इ० स० ७८ च्या ) दरम्यानचा काल, जे ऐतिहासिक पुरुष होते असें त्यांच्या नाण्यांवरून शाबित होतें अशा साइहेर्मिओस कोझुलो क्याडफिसेझ, काझोला क्याडफेझ, आणि उइमोक्याडफिसेझ, इत्यादि राजांनीं कसा सुरेख भरून येतो हेंही त्यांनीं दाखविलें आहे. ह्याप्रकारें त्यांनीं सिद्धांत ठरविला आहे कीं, इ० स० ७८ सालांत आरंभ पावणारा काल, जर कोणा ऐतिहासिक राजापासून चालू झाला असेल, तर तो काल कनिष्काचाच असला पाहिजे; आणि अशोकाचा (२५९–२२२ ख्रि० पू० हा) काल, चंद्रगुप्ताचा (ख्रि० पू० ३१५–२९१—हा) काल, आणि ह्युएन थ्संग ह्याचा समकाल जो शिलादित्य, त्याचा काल, हे जसे हिंदुस्तानाच्या इतिहासांत मैलांच्या खुणेचे विश्वसनीय आणि उपयोगी दगड आहेत, तसाच तो शककालही खुणेचा दगड आहे. कनिष्काच्या पुढें हुविष्क झाला, हुविष्कापुढें वासुदेव झाला, आणि नाण्यांच्या प्रमाणांवर इतबार ठेवला तर, वासुदेवानें इ० स० १७८ सालाच्या सुमारापर्यंत राज्य केलें; म्हणजे चिनई बखरी लिहिणारे, ' जित्सुनन नांवच्या स्थलीं हिंदुस्तानच्या सरहद्दीवर एक किल्ला होता, त्याच्या तटाबाहेरून परदेशीय लोक हिंदुस्तानांत जेव्हां एकसारखे येत असत ' असें सांगतात त्या कालापर्यंत.

शक राजांना हिंदुस्तानांतून हाकून दिल्यावर पुढें काय प्रकार झाला तो कळत नाहीं, नवीन ब्राह्मणी राजकुलें, ( असें गुप्तांचें कुल, आणि वलभीच्या राजांचें कुल, जीं वेगळाले म्हणजे एक इ० स० १९० त, व दुसरा इ० स० ३१० त, सुरू होणारा काल वापरीत ) पुनः उत्पन्न होऊन थीरथावर होई तोंपर्यंत, शकांना घालवून दिल्यानंतरचा काल अगदीं धांदलीचा किंवा दंग्याचा होता, असें हिंदुलोक तर स्वयें मानतात. ह्याविषयीं प्रमाण, गार्गी संहितानामक ज्योतिःशास्त्र विषयक एक दुसऱ्या तिसऱ्या शतकांतील ग्रंथ आहे, त्यांत भविष्यकथनासारखीं वाक्यें आहेत.

शककालालाच शालिवाहन काल म्हणत. ह्याविषयीं मुहूर्त गणपति, मुहूर्त मार्तंड वगैरे ग्रंथांत प्रमाणें आहेत.

## विद्यासंबंधी विक्रमादित्यकाल.

कालिदास, आणि अधिक किंवा कमी मानानें तत्समकाल असा ग्रंथकलाप, ह्यांच्या खऱ्या कालाची आम्हांला विशेष जरूर खरी, परंतु पूर्वोक्त वादग्रस्त गोष्टींचा पूर्वी विचार करणें फार आवश्यक होतें. आम्हीं इ० स० १८६३ त डाक्टर भाऊ दाजी ह्यांच्याशीं पत्रद्वारें ह्या साऱ्या कालगणनाविषयक आणि विद्यासंबंधी प्रश्नाविषयीं वाद केला, आणि त्या वेळीं आम्हीं जीं आपलीं मतें त्यांना कळविलीं होतीं, व ज्यांतून कांहीं त्यांनीं त्या वेळीं प्रसिद्धही केलीं होतीं, तींच सामान्यत: जरी आमचीं मतें हालीं आहेत तरी, कित्येक मुद्दयांविषयीं आमचीं मतें थोडीं पालटलेलीं आहेत. आणि आतां जीं आम्हीं लिहून प्रसिद्ध करीत आहोंत, तीं तरी काईमच अशीं नाहींत, आणि तीं दुरुस्तीला पात्र आहेत अशीं समजावीं.

आतां, ज्या विक्रमादित्याच्या कारकीर्दींत ख्रि० पू० ५६ व्या सालापासून सुरू होणारा संवतकाल प्रथम कृत झाला, तो विक्रमादित्य जर ख्रि०पू० च्या पहिल्या शतकांत नसून, तदनंतरच्या सहाव्या शतकांत होऊन गेला असेल तर, आम्ही हा प्रश्न करतों कीं, कालिदास आणि तत्समकाल त्याचे मित्रही त्याच कालीं होऊन गेले नसतील काय ? कालिदासाचें, आणि किरातार्जुनीय काव्याचा कर्ता भारवी ह्याचें, नांव एका कोरींव लेखांत सांगितलेलें आहे. त्यावर मिति शके ५५६ म्हणजे इ० स० ६३७ ही आहे. ही एका बाजूची मर्यादा आहे. आणि त्या मितीला ते दोघेही हिंदुस्तानांत प्रख्यातीस आले होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. आतां उलट्या दुसऱ्या बाजूची कांहीं तरी कालमर्यादा आपणांस ठरवितां येईल किंवा नाहीं तें पाहूं.

## वसुबंधु.

ह्यूएन थ्संग सांगतो कीं वसुबंधु (मनोहृत याचा शिष्य) हा श्रावष्ठीचा विक्रमादित्य ह्याचा समकाल होता. श्रावष्ठीही विक्रमादित्याची उत्तरेकडील राजधानी असावी. हा वसुबंधु मोठा विख्यात बौद्धग्रंथकार होता, आणि त्याचा काळ, ह्यूएन थ्संग ह्याच्या लेखावरूनच केवळ नव्हे, तर बौद्धलोकांच्या विद्यासंबंधी इतिहासावरूनही बऱ्याच निश्चयानें ठरवितां येतो. तो असंगाचा बंधु, आणि संघभद्र ह्याचा शिष्य होता. तिबेटांतील एक बखर लिहिणारा सांगतो कीं, बुद्धाच्या मृत्यूनंतर ९०० वर्षांनीं आर्यअसंग आणि वसुबंधु हे झाले. आम्हीं विक्रमादित्याला सहाव्या शतकाच्या पूर्वार्धांत मांडला आहे, म्हणजे ह्यूएनथ्संगाच्या पूर्वी सुमारें १०० वर्षें. आतां कनिष्काचें जन्म बुद्धाच्या मृत्यूनंतर ४०० वर्षांनीं, आणि असंगाचें ९०० वर्षांनीं झालें असें बौद्धग्रंथकार लिहितात, ही गोष्ट लक्ष्यांत आणली तर, कनिष्क आणि असंग ह्यांच्या दरम्यान ५०० वर्षांचा अवधि असला पाहिजे. आणि जर कनिष्काचा राज्याभिषेक इ० स० ७८ त झाला हें सत्य असेल तर, असंग, व वसुबंधु, ह्यांचा काळ सहाव्या शतकाचें उत्तरार्ध हा सुमारानें ठरतो.

दुसरी एक गोष्ट डाक्टर भाऊ दाजी ह्या अति चतुर संस्कृतज्ञ पंडितांनीं प्रसिद्धीस आणिली आहे. त्यांचा मृत्यु हें हिंदुस्तानांतील तद्देशीय लोकांतील पांडित्याच्या अभिवृद्धीला मोठेंच गंडांतर आलें असें म्हटलें पाहिजे. ह्यांनीं मुंबई एथील एशिआटिक सोसैटीच्या एका सभेपुढें इ० स० १८६० त एक निबंध वाचला, त्यांत, त्यांनीं येणेंप्रमाणें लिहिलें आहे. 'मेघदूताच्या १४ व्या पद्यावरील टीकेंत मल्लिनाथ हे, प्रसंगवशात् दिग्नागाचार्य, आणि निचुल, हे कालिदासाचे समकाल होते, त्यांतून पहिला हा त्याचा शत्रु, आणि दुसरा हा त्याचा सोबती आणि जिवलग मित्र होता असें लिहितात.' निचुल, व दिग्नाग, ह्यांविषयीं कालिदासाच्या शब्दांनीं केलेला हा उल्लेख मल्लिनाथानें धुंडून काढिला, त्याविषयीं आपणांला काय पाहिजे तें वाटो. आम्हांला तर मल्लिनाथाच्या लेखाच्या सत्यतेविषयीं बिलकूल शंका वाटत नाहीं, हें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. तथापि निचुल, व दिग्नाग, हे कालिदासाचे समकाल म्हणून पक्कें माहीत असल्यावांचून मल्लिनाथ तसें लिहिण्यास धजला नसता, ह्यांत काडीमात्र संशय नाहीं. दिग्नाग हें नांव सामान्य नाहीं, आणि पूर्वीं आम्हीं प्रमाण दाखविलें आहे त्यावरून, दिग्नाग हा असंगाचा शिष्य होता, आणि असंग हा विक्रमादित्याचा समकाल होता, हें आपणांस कळलें म्हणजे, कालिदासाला सहाव्या शतकाच्या मध्यांत मांडण्याला आम्हाला बहुशः धीर येईल.

## प्रवरसेन—काश्मीरचा राजा.

आम्हीं वर सांगितलेल्या गोष्टींनीं पुष्कळ भरंवसा येतो. एवढ्यानेंच झालें नाहीं. दुसऱ्या आणखी आधार देणाऱ्या गोष्टी आहेत, त्यांनीं कालिदास, व त्याचा आश्रयदाता उज्जयिनीचा विक्रमादित्य ह्यांचा काल जो आम्हीं ठरविला आहे, त्याला बळकटी येते. आतां पुढें त्यांचा विचार करावयाचा आहे. त्या सर्व २० वर्षांपूर्वी डाक्टर भाऊ दाजी ह्यांनीं पहिल्यानें प्रदर्शित केल्या, तेव्हां त्यांच्या त्या कोव्या पुष्कळां संस्कृतज्ञांना त्या काळीं मोठ्या मतक्रांति करणाऱ्याशा वाटल्या. तथापि आम्हांला त्या संमत आहेत, असें भाऊ दाजीस आम्हीं कळविलें होतें. डाक्टर भाऊ दाजी ह्यांचा तर्क असा होता कीं, महाराज विक्रमादित्य, ज्यानें विक्रमसंवतकाल स्थापन केला, तो कांहीं वर्षेंपर्यंत तरी काश्मीरचा राजा प्रवरसेन ह्याचा समकाल असला पाहिजे. राजतरंगिणी (अ० ३ श्लोक १०२-२५२ पर्यंत) वरून कळतें कीं, श्रेष्ठसेन राजाला हिरण्य आणि तोरमाण असे दोन पुत्र होते, त्या दोघांनींही मिळून कांहीं वर्षे काश्मीरचें राज्य केलें. पुढें हिरण्याला आपल्या भावाविषयीं मत्सर उत्पन्न होऊन त्यानें त्याला बंदींत टाकलें. तोरमाणाची पत्नी अंगना ही इक्ष्वाकूच्या कुलांतील वज्रेन्द्र राजाची कन्या होती, तिला प्रवरसेन नामक पुत्र झाला. तोरमाण, व चुलता हिरण्य, हे वारल्यावर प्रवरसेन, काश्मीरच्या गादीवर आपला परंपरया हक्क सांगून गादी मिळविण्याला समर्थ नव्हता असें दिसतें. अशी स्थिति असतां, शकांचा संहारकर्ता, व हिंदुस्तानांतील एक छत्र चक्रवर्ती ज्याला मानीत, असा जो उज्जयिनीचा विक्रमादित्य (ह्याला हर्ष असेंही म्हणत) ह्यानें, मातृगुप्त नामक एक विख्यात कवि त्याच्या दरबारीं नौकरी मिळवावी ह्या हेतूनें आलेला होता, त्याला काश्मीरच्या गादी-

चा अधिकारी नेमलें. मातृगुप्तानें त्याचा आश्रयदाता विक्रमादित्य ह्याच्या मरणकाळपर्यंत काश्मीरचें राज्य केलें. नंतर तो राज्य सोडून संन्यास घेऊन वाराणसी एथें राहवयास गेला; आणि प्रवरसेन त्याच्या पश्चात् काश्मीरच्या गादीवर बसला. तो प्रवरसेन इतका बलाढ्य झाला कीं, विक्रमादित्याचा पुत्र शिलादित्य प्रतापशील ह्याची उज्जयिनीच्या गादीवर त्यानें पुनः स्थापना केली.

डाक्टर भाऊ दाजी ह्यांनीं धीरानें असा तर्क काढिला कीं, जो मातृगुप्त कांहीं वर्षे काश्मीरचें राज्य करीत होता, तोच तो महासमर्थ कवि कालिदास होय; आणि ते स्वच्छ सांगतात कीं, कालिदासावर विक्रमादित्याचें असें विचित्र प्रेम जडलें होतें कीं, त्यानें त्याला आपलें अर्ध राज्य दिलें, अशी दंतकथा सर्वकाळ प्रसिद्ध आहे. आमची खात्री तर होत नाहीं हें खरें, तथापि, ह्या मताच्या पुष्ट्यर्थ भाऊ दाजी ह्यांच्या कोट्या तरी निदान फार पांडित्याच्या आहेत. असें सांगितल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

आतां पहिल्यानें मातृगुप्त ह्या नांवाविषयीं विचार करूं. भारतवर्षीय विद्येच्या इतिहासांत जीं नांवें आढळतात, तीं वारंवार बहुमानार्थक प्रतिष्ठादर्शक बिरुदें, किंवा किताब ह्यांसारखीं असतात, आणि पुरुषांचीं व्यक्तिनामें म्हणून जीं असतात, त्यांचा कांहीं अर्थ होत असेल तर, तोच अर्थ निरनिराळ्या शब्दांनीं दाखवीत असतात. त्रिकांडशेषांत रघुकर, मेधारुद्र, आणि कोटिजित्, हे कालिदास शब्दाचे अपर पर्याय म्हणून सांगितले आहेत. कालिदास ह्या शब्दाचा अर्थ काली नामक देवीचा सेवक हा. ह्या शब्दाबद्दल कालिगुप्त असा शब्द कोठें सांपडेल तर, तो कालिदासाचाच अपर पर्याय म्हणून मानण्याला थोडीच शंका वाटेल. काली ही मातृ, अथवा माता, म्हणून ज्या मानलेल्या आहेत, त्यांपैकींच एक आहे. ह्यास्तव, मातृगुप्त ह्या शब्दानें कालिगुप्त किंवा कालिदास ह्यांचाच अर्थ द्योतित होतो.

नंतर भाऊ दाजी विचारतात, मातृगुप्त कोण होता ? तो तर महान् कवि असला पाहिजे, असें असून काश्मीरच्या इतिहासाहून अन्यत्र त्याचें नांव कोठेंहीं आढळत नाहीं.

दुसरें असें कीं, त्या काश्मीरच्या इतिहासाचा कर्ता दुसऱ्या कवींचीं नांवें सांगतो त्यांत, भवभूतीचें देखील नांव आहे, तो तर कालिदासाहून आधुनिक कवि आहे. परंतु कालिदासाचें नांव कोठेंही तो सांगत नाहीं.

तिसरें असें कीं, प्रवरसेन राज्यारूढ होऊन मातृगुप्त ( कालिदास ) वाराणसीस संन्यास घेऊन गेला तेव्हां, मित्रांप्रमाणें त्यांचा वियोग झाला. आतां प्राकृतभाषेंत सेतुकाव्य नामक एक काव्य आहे, व त्यावर एक संस्कृत टीकाही आहे. त्या टीकेंत लिहिलेलें आहे कीं, प्रवरसेनाच्या विनवणीवरून कालिदासानें तें काव्य केलें ( हें काव्य १८८० त छापलेलें आहे ). पूर्वी मातृगुप्ताचें नांव कोठेंही आढळत नाहीं असें म्हटलें परंतु, डाक्टर भाऊ दाजी ह्यांना शाकुंतलनाटकावर एक राघवभट्ट, पृथ्वीधर ( विश्वेश्वर पट्टण म्हणजे वाराणसी एथील राहणारा ) ह्याचा पुत्र ह्याची टीका सांपडली, तींत नाट्यरचनेच्या गुणदोषासंबंधानें मातृगुप्ताचा ग्रंथांश अवतारित आहे. त्याच टीकेंत कालिदासाच्या श्लोकांच्या तोडीचे श्लोक आढळले, आणि हयग्रीववध नामक भर्तृमेंठ उर्फ भर्तृमेन्थ ह्यानें एक मातृगुप्ताच्या अल्पशा कारकीर्दींत लि-

हिलेल्या नाटकांतील एक श्लोक अवतारित आहे. विद्यानाथ ह्यांच्या प्रतापरुद्र नामक ग्रंथांत ( हा ग्रंथ बाराव्या शतकांतला आहे ) एक सेतुकाव्यांतील आर्या घेतलेली आहे, त्या सेतुकाव्याला महाप्रबंध असें म्हटलेलें आहे. दण्डी ( सहाव्या शतकांतील ) ह्यानें आपल्या काव्यादर्शात सेतुकाव्याला सुंदर पद्यांचा सागर असें म्हटलेलें आहे. शेवटीं सुंदर नामक कवीच्या वाराणसीदर्पण नामक ग्रंथांवरील रामाश्रम नामक टीकाकारानें, कालिदासानें सेतुकाव्य केलें असें लिहिलेलें आहे. वितस्तानदीवर त्या कालीं काश्मीरची राजधानी होती, त्या नदीवर प्रवरसेन राजानें एक विख्यात होड्यांचा पूल बांधविला होता. (राजतरंगिणी अ. ३ श्लो. ३५४ पहा.) आणि त्या महत्कृत्याच्या संबंधानें कालिदासानें तें आपलें सेतुकाव्य रचलें अशी कल्पना केलेली आहे. ती निदान बाणकवीच्या हर्षचरितांतील पुढील पद्यांवरून अनुमित होते.

कीर्तिः प्रवरसेनस्य प्रयाता कुमुदोज्ज्वला ।
सागरस्य परम्पारम् कपिसेनेव सेतुना ॥
निर्गतासु न वा कस्य कालिदासस्य सूक्तिषु ।
प्रीतिर्मधुरसार्द्रासु मंजरीष्विव जायते? ॥

अस्तु, आम्हीं इतका वेळ लिहिलेल्या मजकुरावरून दुसरें कांहीं सिद्ध झालें नाहीं तरी, निदान कालिदासाची कीर्ति सातव्या शतकाच्या आरंभाच्या सुमारास झाली, आणि काश्मीराशीं व तेथील प्रवरसेन राजाशीं त्याचा संबंध होता, इतकें तरी साबीत होतें. ही गोष्ट एथें कळविणें रास्त आहे कीं, डाक्टर भाऊ दाजी ह्यांनीं, कालिदास आणि मातृगुप्त हे एकच म्हणून जीं त्यांचीं प्रमाणें व कोट्या वर लिहिलेल्या आहेत त्यांवर स्वयेंच कांहीं आक्षेप आणलेले होते. ते म्हणतात, ‘ कालिदास हा सारस्वत ब्राह्मण होता, व तो शिव व पार्वती ह्यांचा उपासक होता. परंतु मातृगुप्त काश्मीरचा राजा, ह्यानें, राजतरंगिणीवरून पाहतां, बौद्ध व जैन लोकांना संतुष्ट ठेवावें म्हणून, जीवांची हिंसा अगदीं मना केली होती; शिवाय, मातृगुप्तानें एक विष्णूचें मंदिर बांधवून वैष्णवांना खुषी केलें होतें, व सेतुकाव्यांत प्रथम विष्णूचें स्तवन करून नंतर शिवाचें केलेलें आहे.’ परंतु आम्हांला ह्या आक्षेपांत कांहीं महत्त्व वाटलें नाहीं. आम्हांला मोठी शंका जी वाटते, व जी १८६१ इ० त आम्हीं भाऊ दाजींस लिहून कळविलीही होती, ती ही कीं, राजतरंगिणींत मातृगुप्त हा कवि होता असें म्हटलेलें आहे, असें असून तो आणि कालिदास एक असें कां सांगितलेलें नाहीं? राजतरंगिणी हा कल्हण पंडिताचा ग्रन्थ आहे. त्याला विद्या, पण्डित, ह्यांचा इतिहास इतका चांगला माहित असून, मातृगुप्तानें काश्मीरचें राज्य मिळविणें असलें विचित्र चरित्र कथन केलें आहे, परंतु त्या ग्रंथांत तो मातृगुप्त आणि कालिदास हे एकच अशी त्यानें सूचना सुद्धां एके ठिकाणींही करूं नये, हें शक्य आहे काय?

अस्तु, माध्यमिक कालिक सर्व संस्कृत विद्येच्या इतिहासाची रूपरेखा नवीन सांगावी हा आमचा उद्देश नाहीं; परंतु त्या इतिहासाची आजपर्यंत किती अस्ताव्यस्त स्थिति आहे, हें मनांत आणलें म्हणजे आम्हीं ही जी सांखळ बांधित आणली आहे,

तींत सहज बसून जाणाऱ्या अशा आणखी कांहीं गोष्टी सांगितल्या असतां बहुत उपयोग होईल असें वाटतें.

## प्राचीन ज्योतिषी.

संस्कृत विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या कालांतील अति प्राचीन असून ज्यांचे काल निश्चित करितां येतात, असे ग्रन्थ म्हटले म्हणजे ज्योतिष्यांचे ग्रन्थ होत. त्या ग्रन्थांपासून होणारें ज्ञान हें, कालिदास आणि त्याचे समकाल ग्रन्थकार ह्यांना पूर्वसिद्धच होतें, ह्यास्तव ते ज्योतिषग्रन्थ विक्रमादित्याच्या कालाच्या पूर्वींचे असले पाहिजेत असें अनुमान सहज निघतें. परंतु आम्हीं कल्पिलेला टयूरेनियन लोपकाल (म्हणजे ख्रि० पू० १०० पासून इ० स० ३०० पर्यंतचा काल ) हा खरा असेल तर, ते ज्योतिषग्रन्थ फार फार झाले तर इ० स० च्या तिसऱ्या शतकाच्या पूर्वींचे नसले पाहिजेत.

हिंदुस्तानांतील ज्योतिषशास्त्राचा व गणितशास्त्राचा संस्थापक म्हटला म्हणजे वृद्ध आर्य भट्ट, अथवा आर्य भट्ट, हा होय. त्यांच्या ग्रंथांतील वचनें वराहमिहिर, ब्रह्मगुप्त, भट्टोत्पल, आणि भास्कराचार्य, ह्यांनीं घेतलेलीं आहेत. त्याचें जन्म, तोच स्वयें सांगतो कीं, इ० स० ४७६ त झालें. तो, ज्या कशाला आर्यभट्टीय सूत्र असें म्हणतात, त्याचा कर्ता होता. त्या सूत्रांत (१) दशगीतिकेचे १० श्लोक, आणि आर्याष्टशत म्हणजे १०८ आर्या, (ह्या आर्याष्टशतकाचे तीन पाद आहेत.) मिळून एक भाग, (२) गणितपाद, (३) कालक्रियापाद, आणि (४) गोलपाद, असे चार भाग आहेत. त्यानें आणखी कांहीं ह्याहून अधिक लिहिलेलें दिसत नाहीं, तथापि, पृथ्वी आपल्या आंसावर फिरते, व सूर्यग्रहणें व चंद्रग्रहणें ह्यांचीं वास्तविक कारणें, ह्या गोष्टी त्यानें धाडसानें सांगितल्यामुळें त्याची कीर्ति चिरकाल राहील. हा आर्यभट्ट अति प्राचीन ज्योतिषशास्त्रज्ञ होता. तो पाटलिपुत्र एथें, पांचव्या शतकाच्या समाप्तीस, आणि सहाव्या शतकाच्या आरंभीं, होऊन गेला ही गोष्ट निःसंशय आहे. आर्यभट्टाच्या ग्रंथांत एकाही पूर्वग्रंथकाराचा उल्लेख नाहीं त्यापक्षीं, त्याच्या पूर्वीं कोणी ज्योतिषी होऊन गेला नाहीं हें स्पष्ट होतें.

तदनंतर वराहमिहिर झाला, तो आदित्यदासाचा पुत्र आणि शिष्य होता. तो जन्मानें उज्जयिनीकर होता. त्याचें जन्मस्थान अवन्ति देशांत कपित्थक हें होतें. त्यानें अनेक ग्रंथ लिहिले. त्यांत पहिला, करण. तो सामान्यतः पंचसिद्धांतिका ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. कारण त्यांत पांच सिद्धांत आहेत. दुसरा, होराशास्त्र. त्याचे जातक, यात्रिक, आणि विवाहपटल, असे तीन भाग आहेत. शेवटचा बृहत्संहिता. त्याचे ग्रंथ बहुशः आर्याछंदांत लिहिलेले आहेत. तो शके ५०९ त मुताबीक इ० स० ५८७ त मरण पावला; आणि कालगणना संबंधानें पाहूं जातां, तो नवरत्नांतील एक रत्न ह्या पदवीस, आणि कालिदासाचा समकाल म्हणविण्यास, योग्य आहे. तो आर्यभट्टाचा उल्लेख करतो, आणि रोमक सिद्धांताचा काल स्वीकारतो. त्या कालाचा आरंभ, डाक्टर भाऊ दाजी सांगतात कीं, इ० स० ५०५ त होतो. त्यानें पौलिश, वासिष्ठ, सौर, आणि पैतामह, हे पूर्व सिद्धांत होते असें सांगितलेलें आहे, ते सर्व अर्थात् सहाव्या शतकांतले असले पाहिजेत.

तदनंतरचा मोठा गणितशास्त्रज्ञ म्हटला म्हणजे ब्रह्मगुप्त हा होय. त्यानें तीस वर्षांच्या वयाचा झाल्यावर इ० स० ६२८ त ब्रह्मस्फुट सिद्धांत नामक ग्रंथ लिहिला. त्याच्या बापाचें नांव जिष्णु हें होतें. कालिदासाचा समकाल एक जिष्णु म्हणून होता असें सांगतात, तो तोच कदाचित् असेल. पुढील दोघे ज्योतिषी जरी आधुनिक होते तरी, त्यांचे एथें काल सांगण्यास हरकत नाहीं. वराहमिहिरावर टीकाकार एक भट्टोत्पल म्हणून होता, त्याचा काल इ० स० ९६७ हा, आणि सिद्धांतशिरोमणीचा कर्ता भास्कराचार्य म्हणून होता, त्याचा जन्म काल इ० स० १११४ हा.

आमच्या कार्याला मोठी महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे, वर सांगितलेल्या सर्व ग्रंथांत, व तसाच विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या काळांतील काव्यात्मक ग्रंथांतही, ग्रीक लोकांचा संपर्क उघड दिसतो ती होय. फार कशाला, हिंदुस्तानांत ग्रीक लोकांचें राशिचक्र स्वीकारलें होतें ही एवढी एकच गोष्ट घेऊन तिजविषयीं लिहूं लागलों तर, पुरावा अनिवार्य आहे. हिंदुस्तानांतील कित्येक विख्यात विद्वान लोक, त्या आविष्कृत गोष्टीपासून निघणारीं सर्व अनुमानें टाळण्याविषयीं यत्न करितात, एवढ्याचमुळें तिचा एथें उल्लेख केला पाहिजे. त्या विद्वानांनीं गर्गाचार्य काय म्हणतात तेवढें स्मरत जावें. तें हें. 'यवन ( म्हणजे ग्रीक लोक ) हे म्लेच्छ तर खरेच, परंतु त्यांच्यांत ही विद्या ( म्हणजे ज्योतिषविद्या ) फार सुदृढ स्थापित झालेली आहे. ह्यास्तव जणूं ते ऋषीच असें समजून त्यांना मान देतात. मग द्विजन्मा पुरुष असून जर तो ज्योतिषी असेल तर त्याला किती मान दिला पाहिजे !'

अस्तु, ज्योतिषाचें ज्ञान ग्रीक लोकांपासून हिंदुस्तानांत आलें ह्याविषयीं एतद्देशीय प्राचीन ग्रंथकारांच्या ग्रंथांतून वचन-प्रमाणें विस्तारानें सांगून प्रोफेसर म्याक्सम्युइल्लर लिहितात तें येणेंप्रमाणें. ग्रीक ज्योतिषाचें आणि ग्रीक ज्योतिषपरिभाषेचेंही ज्ञान हिंदुस्तानांत पांचव्या शतकाहून अधिक आधुनिक कालांत आलें नाहीं. तेव्हां जर कालिदासाच्या काव्यांत, व त्याच्या समकाल कवींच्या काव्यांत, त्या ग्रीक ज्योतिष ज्ञानाचा मागमूस स्पष्ट सांपडतो तर, संस्कृत काव्याचें पुनरुज्जीवन सहाव्या शतकांत झालें असा जो आमचा पक्ष आहे, त्याला नवीनच टेंकू मिळतो. कालिदासाला ग्रीक ज्योतिषाचें होराशास्त्रग्रंथांत समाविष्ट झालेलें ज्ञान पुष्कळ होतें. हें त्याच्या रघुवंश व कुमारसंभव ह्या काव्यांवरून स्पष्ट होतें. ही गोष्ट डाक्टर ज्याकोबी ह्यांनीं खुलाशानें दाखविली आहे. ज्याकोबी ह्यांनीं, कुमारसंभव सर्ग ७ श्लोक १ ह्यांत 'जामित्र' हा शब्द वापरलेला आहे तो ग्रीक भाषेंतील शब्द असून, संस्कृत ज्योतिषशास्त्री ह्यांनीं जे अनेक शब्द ग्रीक भाषेंतून घेतलेले आहेत त्यांपैकीं एक आहे, अशी खरमरीत टीका केलेली आहे. शंकर पांडुरंग पंडित ह्यांनीं आपल्या रघुवंशाच्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत, असल्या मजबूत पुराव्यावरून उन्नीत होणाऱ्या सिद्धांतांचें बल कमी करण्याविषयीं प्रयत्न केलेला आहे, तो निष्फल आहे. त्यांनीं ( रघुवंश सर्ग १२, श्लो० २८ ह्यावरून ) राहू चंद्रास ग्रासतो अशी कालिदासाची समजूत होती ती, आर्यभटाच्या काळाच्याही पूर्वींची होती असें दाखविलें असतें तर चाललें; परंतु त्याच रघुवंशांत ( सर्ग १४, श्लो० ४० ) 'जो वस्तुतः पृथ्वीचो छाया आहे तिलाच

लोक चंद्राचें अशौच असें मानतात ' अशी उक्ति आहे तीवरून कालिदासाला आर्यभट्ट ह्याच्या ज्योतिषाची खास माहिती होती असें स्पष्ट दिसतें. शंकर पांडुरंग पंडित हे स्वयें ' राशिचक्राच्या आधारानें उत्पन्न झालेल्या फलज्योतिषाची ' कालिदासाला माहिती होती ही गोष्ट सिद्ध करण्यासाठीं त्याच्या काव्यांतून कित्येक वाक्यें दाखवितात, परंतु 'हिंदूंनीं उसनें किती घेतलें किंवा उसनें किती दिलें हा जो मोठा प्रश्न ' आहे त्याची वाटाघाट ते करीत नाहींत, आणि इतकेंच सुचवितात कीं, हिंदूंनीं ग्रीक लोकांपासून जर कांहीं उसनें घेतलें असलें तर, तें ख्रिस्ती सनाच्या दोन तीन शतकें पूर्वीं घेतलेलें असेल असें कां नसावें ? होय, कदाचित् ख्रिस्ती सनाच्या दोन तीन शतकें पूर्वीं उसनें घेतलें असेल, परंतु आम्ही विचारतों त्या तितक्या प्राचीनकाळीं हिंदुस्तानांत कोणी शास्त्रीय प्रकारचें ज्योतिषशास्त्र जाणणारा पुरुष होता असा कोठें तरी उल्लेख आहे का ?

## अमरसिंह.

इतकी मजल काटल्यावर आतां, नवरत्नें म्हणून ज्यांना म्हणतात, त्यांपैकीं आणखी एका दोघां रत्नांविषयीं विचार करून आम्हीं कालाची सांखळी बांधली आहे तींत त्यांना जागा योग्य आहे किंवा नाहीं ह्याचा निश्चय करण्यास हरकत नाहीं. तेव्हां प्रथम अमर अथवा अमरसिंह हा घेऊं.

ह्या प्रख्यात कोशकाराचा काल निश्चित करण्याविषयीं जनरल कनिंघाम ह्यांनीं मोठा चतुराईचा यत्न केलेला आहे. ते लिहितात तें येणेंप्रमाणें. बुद्धगया एथें एक बुद्ध मंदिर आहे. ह्यूएन थ्संग ह्यानें जें बुद्धमंदिर पाहिलेलें होतें तेंच तें होय. परंतु तें फाहिआनच्या काळांत बांधलेलें नव्हतें. तेव्हां तें इ० स० ४१४, आणि ६४२, ह्यांच्या दरम्यान केव्हां तरी बांधलेलें असलें पाहिजे. मिस्टर वुइल्मो, ह्यांना एक कोरींव लेख सांपडला होता, त्याचें भाषांतर इ० स० १७८५ त मिस्टर वुइल्किन्स ह्यांनी केलें. त्या लेखांत बुद्धगया एथील मंदिर अमरदेव, विक्रमादित्याच्या दरबारांतील नवरत्नांपैकीं एक, ह्यानें बांधविलें असें स्पष्ट लिहिलेलें आहे. ही गोष्ट फार विचित्र आहे. परंतु तो कोरींव लेख संवत् १०१५ (इ० स० ९४९) चा आहे. आणि भाषांतर निर्दोष यथाप्रत आहे किंवा नाहीं हें पडताळण्याला मूळलेख दुर्दैवानें उपलब्ध नाहीं. तथापि त्या भाषांतरावरून माहिती कळते तीवरून, सहाव्या शतकाच्या मध्यांत विक्रमादित्याच्या नवरत्नांपैकीं एक, असा जो अमरसिंह, त्याच्या कालाचा, हा अमरदेव विक्रमादित्याच्या नवरत्नांपैकीं एक, आणि बुद्धगया एथील मंदिर बांधवणारा, ह्याच्या कालाशीं मेळ चांगला पडेल. एथें हें अधिक सांगितलें पाहिजे कीं, स्थ्यानिस्लाझ ज्यूलिअन, हे चिनई भाषेंत अमरकोशाचें भाषांतर, जन्मानें उज्जयिनीचा, अशा कोणीएका गुणरत्न नांवच्या पुरुषानें केलेलें होतें असें लिहितात. तो गुणरत्न च्यू राजकुलांतील वौटी नामक चीनच्या पादशाहाच्या कारकीर्दींत होऊन गेला. परंतु तें भाषांतर अद्यापि उपलब्ध आहे किंवा नाहीं, हें आपणास माहीत नाहीं असें ज्यूलिअन म्हणतात.

## वेताल मेन्थ.

नवरत्नांत वेतालभट्ट, हें दुसरें एक नांव आहे. तो नीतिप्रदीप नामक ग्रंथाचा कर्ता. डाक्टर भाऊ दाजी ह्यांनीं, तो, आणि वेताल मेन्थ, हे एक असें ठरविलें आहे, आणि ते निर्भरानें म्हणतात कीं, तो विक्रमादित्याचा समकाल होता, असें राजतरंगिणींत सांगितलें आहे, परंतु त्यांनीं अध्याय श्लोक अमुक म्हणून लिहिलें नाहीं.

राजशेखर ( १४ व्या शतकांतील ) ह्यानें आपल्या बालरामायणांत भर्तृमेन्थ नामक एका कवीची फार स्तुति केली आहे; तो ग्रन्थ कलकत्त्यांत छापलेला आहे. त्याच्या उपोद्घातांत वाल्मीकि, भर्तृमेन्थ, भवभूति, आणि राजशेखर स्वतः, हे एका योग्यतेचे कवि असें म्हटलेलें आहे.

मंख ( इ० स० ११५० ) सांगतो कीं, त्या भर्तृमेन्थाची शैली सुबंधु, बाण, आणि भारवि, ह्यांच्या शैलीसारखी होती, तींत श्लेषालंकार फार असत.

डाक्टर भाऊ दाजी ह्यांचें मत पाहतां, भर्तृमेन्थ आणि भर्तृभट्ट हे एक, आणि भर्तृभट्ट आणि भर्तृहरी एक, असें मानण्याकडे त्यांची प्रवृत्ति दिसते. परंतु त्याला प्रमाण कांहीं नाहीं.

एक हयग्रीववध नामक काव्याचा कर्ता भर्तृमेन्थ नांवाचा कवि होता, त्याला ( राजतरंगिणी अ० ३, श्लोक २६० ) मातृगुप्तानें पुष्कळ धन दिलें, परंतु वेतालमेन्थ हें नांव कोठें सांपडत नाहीं.

नवरत्नांपैकीं आणखी बाकीच्यांचा विचार करणें आम्हांला बरें वाटत नाहीं. कारण, धन्वंतरि, क्षपणक, शंकु, घटकर्पर, आणि वररुचि, ह्यांच्या गुणदोषांविषयीं व कालाविषयीं अन्य विद्वान पुरुषांनीं ज्या थोड्या बहुत मोघम अरळ तरळ कल्पना केलेल्या आहेत, त्याच पुनः सांगितल्या पाहिजेत, त्यांवांचून गत्यंतर नाहीं. आतां, ह्यूएन थ्संग ह्यांच्या ग्रन्थांत सहाव्या आणि सातव्या शतकांतील ग्रन्थकलापाविषयीं उल्लेख आलेले आहेत. ह्यास्तव, संस्कृत ग्रन्थकारांतील कित्येक प्रख्यात ग्रंथकारांचे काल निश्चित करण्याला उपयोगी अशा ह्यूएन थ्संग ह्यानें सूचना केलेल्या आहेत, त्यांचा विचार करूं.

## बाण आणि मयूर.

बाण हा कान्यकुब्जचा राजा शिलादित्य ह्याच्या दरबारीं होता, हें पूर्वी पाहण्यांत आलेंच आहे. त्याचा काल, आणि त्याचे ग्रन्थ कादम्बरी, आणि हजार वांच्यांनीं त्याचाच म्हणतां येईल. असा ग्रन्थ रत्नावलि ( जरी नागानंदाप्रमाणें तो हर्षाचाच असें म्हणतात तरी ) ह्यांचा काल सातव्या शतकाच्या प्रथमार्धांत निश्चयानें मांडतां येतो. बाण स्वतः हर्षचरितांत सांगतो कीं, भद्र, नारायण, ईशान, आणि मयूरक, हे आपल्या मित्रांत मीं गणतों. बाण आणि मयूर ह्यांविषयीं संगतीनें उल्लेख असतो. बाण हा मयूराचा जांवई होता. भक्तामरस्तोत्र नामक ग्रन्थावरील एका जैन टीकाकारानें बाण आणि मयूर ह्यांच्याविषयीं कथा सांगितलेली आहे ती येणेंप्रमाणें.-मयूर हा वृद्ध भोज ह्याच्या पदरीं उज्जयिनी एथें मोठा सन्मानित पंडित होता. त्याचा जांवई बाण हाही मोठा विद्वान् होता. त्या दोघांत मी मोठा विद्वान्, कीं तूं मोठा विद्वान्

ह्या गोष्टीविषयीं कलह उत्पन्न झाला, तेव्हां, त्या राजानें त्या दोघांसही, काश्मीर त्या कालीं मोठें विद्यापीठ होतें तेथें, कोण मोठा विद्वान् ह्याचा उलगडा करून घेण्यास जा, असें सांगून त्यांस तेथें पाठविलें. तेथें निर्णय कांहींसा बाणाच्याच वतीचा झाला. नंतर ते भोजाच्या राजधानीला परत आले. तेव्हां एकवेळ सासरा मयूर ह्यानें बाण व त्याची बायको आपली कन्या या उभयतांत कांहीं भांडण झालेलें ऐकलें, तेव्हां त्यानें तिला चंडी असें म्हटलें. तें ऐकतांच तूं रक्तपित्या होशील असा तिनें त्याला शाप दिला. तेव्हां त्याला रक्तपिती झाली. मग त्यानें सूर्याचें मयूरशतक नामक स्तोत्र केलें. त्यानें सूर्य प्रसन्न होऊन, तो त्या रोगापासून मुक्त झाला, आणि त्यावर भोजाची वहालमर्जी झाली. बाणाला त्या गोष्टीनें मत्सर उत्पन्न होऊन, आपले हातपाय त्यानें तोडून घेतले, आणि चंडिकेचें स्तोत्र करून त्या देवीचा स्तव करितांच त्याचे हातपाय पूर्ववत् आले. मग आपले साधु पुरुषही अशींच अमानुष कृत्यें करितात हें भोजास दाखवावें म्हणून जैनांनीं आपला साधु मानतुंगसूरि ह्याला आणून हजर केलें. त्यानें ४२ शृंखलांनीं आपल्याला जखडून घेतलें, आणि त्यानें ४२ श्लोकात्मक भक्तामरस्तोत्र केलें, तेव्हां तो त्या बंधनांपासून मुक्त झाला.

आतां जर बाण, मयूर, आणि मानतुंगही, हर्षवर्धनराजाच्या दरबारीं सातव्या शतकाच्या आरंभाच्या सुमारास होऊन गेले असतील तर, बाणानें ज्या ग्रन्थकारांचा उल्लेख केलेला आहे, ते त्याच्या पूर्वकालचे असें म्हटलें पाहिजे. ते ग्रन्थकार येणेंप्रमाणें. (१) सुबन्धु (वासवदत्तेचा कर्ता). (२) भट्टार हरिश्चन्द्र. (३) शालिवाहन ऊर्फ शातवाहन (गाथाकोशाचा कर्ता). (४) भास (नाटककार). (५) कालिदास (ह्याचा काल सेतुकाव्याचा कर्ता ह्या नात्यानें प्रवरसेन राजाच्या कालानें निश्चित होतो, आणि मेघदूताचा कर्ता ह्या नात्यानें दिग्नाग ह्याच्या कालानें निश्चित होतो). (६) बृहत्कथा ग्रन्थाचा कर्ता गुणाढ्य, आणि आढ्यराज अथवा आद्यराज. ह्या आढ्यराजाविषयीं कांहीं माहिती लागत नाहीं.

बाण आणि मयूर ह्यांचा सुबन्धु हा समकाल म्हणतात, तथापि, सुबन्धु त्यांच्या पूर्वी कांहीं काल होऊन गेलेला असेल. बाणानें त्याच्याविषयीं उल्लेख केलेला आहे; परंतु सुबंधूनें तसा त्याविषयीं केलेला नाहीं. आणि जेथें कोठें त्या तिघांचा उल्लेख केलेला असतो तेथें सुबन्धूचें नांव प्रथम असतें. बाण आणि दण्डी ह्यांप्रमाणेंच, सुबंधूच्या ग्रन्थांत बृहत्कथेचा कर्ता गुणाढ्य ह्याच्याविषयीं उल्लेख केलेला आहे. आणि त्याला उपनिषदें, भारत, रामायण, हरिवंश, पुराणें, छन्दोविचिति, नक्षत्रविद्या, न्यायस्थिति, उद्योतकर, बौद्धसंगति, अलंकार, कामसूत्र, इत्यादि ग्रंथांची माहिती होती.

## दण्डी.

दशकुमार चरित व काव्यादर्शाचा कर्ता दण्डी हा कदाचित् बाणाहून पूर्वकालिक असेल, परंतु तो कालिदासाच्या पूर्वींचा असें म्हणतां येत नाहीं; अथवा मिस्टर कोल्ब्रूक हेही तसें कधीं म्हणत नाहींत. ते म्हणतात अशी दंतकथा आहे कीं व्यास, वाल्मीकि, ह्यांच्या खालोखाल पदवीचा दण्डी होता असें कालिदास म्हणतो. परंतु ही गोष्ट सुप्र-

ृद्ध आहे कीं, दण्डीनें कालिदासाच्या सेतुबंधनामक प्राकृत काव्याचा आपल्या ग्रंथांत उल्लेख केलेला आहे. तेव्हां दंतकथेचा फार फार आदर केला तर, दण्डी हा ज्या कालिदासानें प्रवरसेन राजाकरितां सेतुबंधकाव्य लिहिलें त्याचा कदाचित् समकाल असेल इतकेंच म्हणवेल.

## भवभूति.

काश्मीरचा राजा ललितादित्य नांवाचा होता, त्याचा काल इ० स० ७०० हा ठरतो. त्यानें कान्यकुब्जचा राजा यशोवर्म ह्यावर जय मिळविला होता. राजतरंगिणींत सांगितलें आहे कीं, हा यशोवर्म, भवभूति, वाक्पति, आणि राज्यश्री, ह्यांचा परिपोषक होता. भवभूति जन्मानें विदर्भ ( वऱ्हाड ) देशांतला होता, परंतु तो कान्यकुब्जांत यशोवर्म राजाच्या दरबारांत आश्रय संपादून राहिला असेल असें म्हणण्यास बाध नाहीं. वाक्पति हा गौडवहनामक प्राकृत काव्याचा कर्ता. त्या काव्यांत गौड राजा वर यशोवर्माचा जय वर्णिलेला आहे; आणि भवभूतीची फार स्तुति केलेली आहे. आतां भवभूतीला आठव्या शतकाच्या पूर्वार्धांत मांडला तर, त्याच्या आणि कालिदासाच्या दरम्यान बरेंच अंतर राहतें, आणि बाणानें इतर कवींच्या नांवांचे हर्षचरिताच्या आरंभीं उल्लेख केलेले आहेत त्यांत भवभूतीचें नांव कां सोडलें ह्याचें कारणही बरोबर बसतें. बाण हर्षवर्धन राजाच्या पदरीं (इ० स० ६१०–६५० पर्यंत) होता.

इ० स० ७५५–७८६ पर्यंत काश्मीरचा राजा जयापीडनांवचा होता. त्याच्या कारकीर्दींत विद्येला आश्रय चांगला होता. त्यानें क्षीर (हा अमरकोशावरील टीकाकार क्षीरस्वामी म्हणतात तोच असावा असा तर्क आहे ) नामक गुरूच्या हाताखालीं संस्कृताचा अभ्यास केला. त्यानें पतंजलीच्या महाभाष्याचा अभ्यास पुनः चालू केला, आणि त्याच्या दरबारीं थक्रिय, भट्ट, दामोदरगुप्त, मनोरथ, शंखवृत्त, चातक, संधिमान आणि वामन हे पंडित होते.

## इत्सिंग.

इत्सिंग नांवचा एक चिनदेशांतील यात्रेकरू होता. त्यानें चीनदेश इ० स० ६७१ च्या ११ व्या मासांत सोडला, आणि तो हिंदुस्तानांत ताम्रलिप्ति एथें इ० स० ६७३ च्या दुसऱ्या महिन्यांत पावला. आणि तेथून त्याच वर्षाच्या पांचव्या महिन्यांत नालंद एथें जाण्यास निघाला. कित्येक वर्षें नालंद एथें राहून, तो ताम्रलिप्ति एथें परत येऊन, तेथून दक्षिण समुद्रांतील देशांतील सिरीफसे एथें जाण्याकरितां जहाजांत बसून गेला. त्यानें दोन वालमाचा एक ग्रंथ लिहिलेला आहे. त्यांत त्यानें कोठें कोठें प्रसंगवशात् लिहिलें आहे त्यावरून कळतें कीं, त्याचें जन्म सुमारें इ० स० ६३५ त झालें, ६७१ त त्यानें चीनदेश सोडला, ६७३ त, ताम्रलिप्त एथें पावला, आणि ६९० पर्यंत तो प्रवासांत होता. त्या वेळेस चीन देशांत थसकनिनमोहाऊ नामक राणी राज्य करीत होती. इत्सिंग इ० स० ७१३ त ७९ वर्षांच्या वयाचा होऊन मरण पावला, आणि तो ६९५ त स्वदेशीं परत गेला होता.

आपल्या ग्रंथाच्या ३४ व्या भागांत इत्सिंगानें पाश्चात्य विद्येविषयीं वर्णन केलेलें

आहे. तें विशेषेंकरून व्याकरणविद्येविषयीं आहे. त्या व्याकरणावर पांच ग्रंथ आहेत, त्या सर्वांना मिळून व्याकरण असें हिंदुस्तानांत म्हणतात असें तो लिहितो. तें येणेंप्रमाणें.

१. पहिल्या ग्रंथाला पारिभाषिक सिद्धांत असें म्हणतात. त्याचा आरंभ 'सिद्धिरस्तु' ह्या शब्दांनीं होतो. तो मूलतः महेश्वरानें शिकविला, किंवा केला, आणि तो मुलें सहा वर्षांचीं असतांना शिकतात. ते तो सहा महिन्यांत शिकतात. अक्षरें ४९ आहेत, त्यांपासून संयुक्त वर्ण १८ प्रकारचे होतात. त्यांपासून १०,००० शब्द होतात. हे शब्द ३२ अक्षरी ३०० श्लोकांत रचलेले आहेत.

२. दुसरा ग्रंथ आहे त्याला सूत्र असें म्हणतात. तो पाणिनिकृत असून, त्यांत १,००० श्लोक आहेत. त्याला महेश्वराचा प्रसाद होऊन ग्रंथ करण्याविषयीं स्फूर्ति झाली. आणि त्याला तीन नेत्र दिले होते असें सांगतात. मुलें आठ वर्षांचीं झालीं म्हणजे तो ग्रंथ शिकावयास आरंभ करतात, आणि तो आठ महिन्यांत शिकतात.

३. तिसरा ग्रंथ धातु ह्यांत १,००० श्लोक आहेत, आणि धातूंची प्रक्रिया त्यांत सांगितली आहे. अर्थात् हा धातुपाठ असावा.

४. खिल हा चवथा ग्रंथ. त्यांत ( १ ) कृदंत आणि तिङंत हा पहिला भाग, त्यांत १,००० श्लोक आहेत. व ( २ ) दुसरा भाग मंच, त्यांत १,००० श्लोक आहेत. आणि ( ३ ) तिसरा भाग उणादि. त्यांत १००० श्लोक आहेत.

दहा वर्षांचीं मुलें तो ग्रंथ तीन वर्षांत शिकतात. मंच म्हणजे धातु व प्रत्यय हे जोडून शब्द साधणें. उणादि हाही तोचप्रकार आहे.

५. पांचवा ग्रंथ वृत्तिसूत्र नांवाचा आहे. त्यांत वरील सूत्रग्रंथावर टीका आहे. अनेक वृत्ति ग्रंथ आहेत त्यांत हा फार उत्कृष्ट आहे. त्यांत १८,००० श्लोक आहेत. त्यांत सूत्रांतील पदच्छेद करून वेगळाले शब्द सांगून, कठिण अंश असेल तो फोड करून समजावून सांगितलेला आहे. पंधरा वर्षांच्या वयानंतर मुलगे तो ग्रंथ शिकूं लागतात, आणि पांच वर्षांत पूर्णपणें समजूं लागतात. ही वृत्ति जयापीड ह्यानें केलेली आहे. तो वारून सुमारें तीस वर्षें झालीं. म्हणजे जयापीड सुमारें इ० स० ६६० त वारला असें निष्पन्न होतें.

तदनंतर वाक्यरचना व गद्यपद्यरचना विद्यार्थी शिकतात. नंतर हेतु विद्या ( न्यायशास्त्र ), व कोश ह्यांकडे ते लागतात. नंतर न्यायद्वार-तारक-शास्त्र शिकून तर्क विद्येंत निष्णात होतात. नंतर जातकमाला शिकतात त्यानें त्यांच्या बुद्धि फार उत्कृष्ट होतात. इ०

## पतंजलीचें महाभाष्य.

इत्सिंग पुढें पुनः वृत्तिसूत्राविषयीं म्हणतो, जयापीडाच्या काशिकावृत्तीवर एक टीका आहे तिला चूर्णि म्हणतात. तींत २४,००० श्लोक आहेत. तो ग्रंथ पतंजलीचा आहे. त्यांत सूत्रवृत्तीविषयीं विशदव्याख्या आहे. ती प्रौढ विद्यार्थी तीन वर्षांत शिकतात. ज्यापक्षीं चूर्णि हें टीकेचा एक अपरपर्याय आहे, आणि तिचा कर्ता पतंजलि म्हणून इत्सिंग स्पष्ट सांगतो त्यापक्षीं, पतंजलीचें महाभाष्य हेंच त्याचें लक्ष्य आहे ह्याविषयीं कांहीं संशय वाटत नाहीं.